


म. ग्रं. सं. ठाणें
षय
. क्र.

# नीलांबरी

(सचित्र)

सुरेश शर्मा

रम्यकथा प्रकाशन, पुणें-३०

मूल्य : २॥ रुपये

प्रकाशक :
बा. ग. मेहेंदळे,
रम्यकथा प्रकाशन,
३९२ नारायण पेठ,
कान्हेरे बिल्डिंग, पुणें–३०

प्रथमावृत्ति : मार्च १९७६

पुनर्मुद्रणाचे सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
बा. ग. मेहेंदळे,
जयभारत मुद्रणालय
५५१ बुधवार पेठ, पुणें २.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
दा. क्र. ७६५५९ ता. ३।८।७६
वि. [illegible]

# स म र्प ण

सौ. अपर्णा दातार

हिला

साशीर्वाद समर्पण.

सुरेश शर्मा

IRBK-0116559
IRBK-0116559

IRBK-0116559
IRBK-0116559

# नीलांबरी

म. ग्रं. सं. ... शाखा.
ग्रा. क्र. ९६५६९ ता. ३१।८।०६
वि. कां. ८११

## एक

वनांत वणवा पसरावा, तशी नीलानें गोल्डन कॅपचें फाउंटन पेन आणल्याची बातमी हां हां म्हणतां तिच्या वर्गांत पसरली. 'पाहूं नीला?' असें म्हणून वर्गांतलीं सारीं मुलें तिच्यापाशीं आलीं. नीलानें त्या पेनाचें टोपण काढलें नि तें पेन त्या मुलांना दाखविलें. त्यांना तें अतिशय आवडलें. त्यांनीं त्या पेनाची तारीफ केली.

नीलाचें नांव 'नीलांबरी नारायण नाडकर्णी' असें शाळेच्या रजिस्टरांत दाखल झालें असलें, तरी तिच्या घरां-तलीं नि शेजारचीं माणसें तिला 'नीला' या संक्षिप्त नांवानें संबोधीत असत. म्हणून तिच्या वर्गांतलीं मुलेंहि तिला त्याच नांवानें संबोधीत असत.

शाळा सुटली नि आपलें पेन बरोबर घेऊन नीला घरीं जाण्यासाठीं निघाली. आपण तें पेन शाळेंत नेलें होतें ही गोष्ट आपली आई नि आपले बाबा यांना कळूं नये, म्हणून तें त्यांना नकळत गुपचुप जागच्याजागीं नेऊन ठेवायचें असा घरीं जातांना

तिनें आपल्या मनांत विचार केला होता. आपण पेन शाळेंत गेल्याचें त्यांना कळलें तर आईकडून नसला, तरी बाबांकडून आपल्याला मार खावा लागणार अशी तिला भीति वाटत होती.

वाटेंत एका ठिकाणीं माकडांचा खेळ चालला होता. नीलाची इच्छा नसतांहि ती तो खेळ पहाण्यासाठीं थांबली. दहा मिनिटें, पंधरा मिनिटें, म्हणतां म्हणतां अर्धा तास झाला, तरी नीला तिथून हालली नाहीं. कारण तो खेळ होताच तसा मजेदार ! नीलाला मोह आवरला नाहीं !

देवजी माकड फारच नखरेल होता. माहेरीं गेलेल्या त्याच्या बायकोनें–भागी माकडीणीनें–आढेवेढे घेतले, सासरीं येण्यास नकार दिला, तेव्हां देवजी माकडाचें पित्त खवळलें. त्यानें आकाशपाताळ एक केलें. अखेर भागीनें जेव्हां त्याच्या पायां पडून त्याची माफी मागितली, तेव्हां कुठें त्याचा राग ओसरला. मग कसा बायकोबरोबर रस्त्यानें ठुमकत ठुमकत चालूं लागला. त्याच्या हातांत काठीहि होती. पँट नि बुशशर्ट हीं तर इतकीं चांगलीं होतीं कीं, त्या बाबतींत कांहीं विचारण्याची सोयच नाहीं ! देवजी माकडानें आपल्या मनगटांत कालकंकणहि (रिस्टवॉच) बांधलें होतें. कालकंकणाशिवाय कसें भागेल ? सारीं कामें वेळेवर पार पाडायला नकोत का ?

अन् नखऱ्याच्या बाबतींत भागी माकडीणहि कांहीं कमी नव्हती. नवऱ्यापेक्षां कांकणभर जास्तच नखरेल होती. आरशांत पाहून ती कंगव्यानें आपले केंस विंचरत होती. माहेराहून सासरीं जातांना ती आपल्या नवऱ्यामागून चालत होती, तेव्हां ती एखाद्या नववधूसारखी दिसत होती !

भागी माकडीण चालून चालून थकली, तेव्हां देवजी माकडानें वाटेंत तिला चहा पाजला. कपांतला चहा बशांत ओतून तीं दोघेंहि मोठ्या मजेंत तो चहा पीत होतीं ! अगदीं आपण माणसें पितों तसा !

मध्येंच देवजीनें बिस्किटें काढलीं नि तीं तो भागीला देऊं लागला, तेव्हां तिनें मान हलवून नकार दर्शविला. आपल्याला तीं आवडत नाहींत असें तिनें त्याला मूक भाषेंत सांगितलें; पण देवजीनें तिचें म्हणणें ऐकलें नाहीं. त्यानें आपल्या हातानें एक बिस्किट तिच्या तोंडांत जबरदस्तीनें कोंबलें, तेव्हां मात्र तिनें त्याचा चट्टामट्टा केला !

त्यानंतर माकडांचा खेळ दाखविणारा तो माणूस 'पैसा फेको, तमाशा देखो !' असें ओरडूं लागला, तेव्हां भागी नि देवजी यांनीं आपापल्या हातांत कटोरे घेतले नि खेळ पहाणाऱ्या शाळकरी मुलांपुढें ते धरून तीं त्यांच्याकडे पैसे मागूं लागलीं ! नीलानेंहि आपल्या पोलक्याच्या खिशांत हात घातला नि आपल्या आईकडून खाऊसाठीं मिळालेल्या पैशांतून उरलेलें दहा पैशांचें एक नाणें त्या माकडाच्या कटोऱ्यांत टाकल्यावर ती तिथून आपल्या घरीं जाण्यासाठीं निघाली.

तिथून घरीं जातांना तिला पेनाचा साफ विसर पडला होता नि तिच्या डोक्यांत माकडा–माकडिणीचा खेळ थैमान घालीत होता !

नीलानें घरीं गेल्यावर जेव्हां आपल्या पुस्तकांची पिशवी कॉटवर फेकली तेव्हां तिला त्या पेनाची आठवण झाली. तिनें शाळेंतून घरीं जातांना तें पेन फ्रॉकला अडकविलें होतें, म्हणून तिनें फ्रॉकवर हात फिरविला नि अखेर किंकाळी फोडली–

'अरे देवा ! मेलें रे मी !'

'काय ग झालें नीलू ?' तिची आई घरांतून धांवत आली.

नीलानें कांहींसुद्धां लपवून ठेवलें नाहीं. भीतीमुळें ती थरथर कांपत होती. आई अधिक कांहीं बोलली नाहीं, तरी आपले वडील आपली पाठ फोडल्याशिवाय रहाणार नाहींत, त्यांना राग आल्यावर त्यांचा चेहरा क्षणांत लालबुंद होतो, असे विचार तिच्या मनांत येत होते. ती उदासपणें इकडेतिकडे पहात होती. त्यावेळीं धरणी दुभंगली असती तर सीतेप्रमाणें नीलानें त्या खाईंत उडी मारली असती !

तिची आई तिला चहा पिण्यासाठीं बोलवायला आली, त्यावेळीं ती मुडद्यासारखी कॉटवर पडली होती. आपले वडील ऑफिसांतून घरीं आले आहेत अन् आपल्या आईनें त्यांना सारें कांहीं सांगितलें आहे; आतां आपली धडगत नाहीं ! किती मौल्यवान होतें तें पेन ! असे विचार त्यावेळीं तिच्या मनांत येत होते.

नीलाचे बाबा त्यावेळीं घरीं आले होते नि पेनाची हकीकत ऐकल्यावर त्यांच्या अंगाची आग आग झाली होती.

'बोलाव त्या डाकिणीला. तिच्या पाठीची चामडीच लोळवतों !' असें रागाच्या भरांत ते बोलले होते; पण नीलाच्या आईनें त्यांना थोपवून धरलें होतें.

'अजून लेकरूं आहे तें ! फाउंटन पेनानें लिहावें असें वाटलें असेल तिला. बरें, आज कित्येक दिवस ती तुम्हांला आपल्यासाठीं एक पेन आणायला सांगत होती विचारी; पण तुम्ही तिच्या सांगण्याकडे लक्ष दिलें नाहीं.' नीलाची आई

नीलाच्या बाबांचा राग शांत करूं पहात होती; पण उलट आगींत तेल ओतलें गेलें !

'पण पेन घेतांना तिनें आपली थोडीशी अक्कल वापरायला हवी होती. माझें साडेसात रुपयांचें पेन ती हरवून बसली अन् तूं...मी आज तिला पिटल्याशिवाय रहाणार नाहीं !' नीलाच्या बाबांचा राग उफाळून वर आला होता.

'नाहीं ! तिच्या अंगाला शिवाल तर माझी शपथ आहे तुम्हाला !' नीलाची आई मध्यें पडून म्हणाली, 'अजून अजाण आहे पोर. कुठली वस्तु साडेसात रुपयांची नि कुठली साडेसात आण्यांची हें तिला कसें कळणार ! तिच्या हातांत आलेल्या दोन्ही वस्तु तिला सारख्या !'

'तूं तिला बिघडवते आहेस.' नीलाच्या बाबांचा निरुपाय झाल्यामुळें ते ओरडले.

'अच्छा, आतां राहूं द्या तुमचें बोलणें.' नीलाची आईसुद्धां कांहीं कच्ची नव्हती. नीलाच्या बाबांचा राग शांत होईस्तोंवर तिनें नीलाला घरांत लपवून ठेवलें. तिला बाहेर येऊं दिलें नाहीं.

अन् जेव्हां दुसऱ्या दिवशीं नीलाच्या बाबांनीं ऑफिसांतून आल्यावर नीलाच्या हातांत दिलेलें गोल्डन क्लिपचें 'नागीण' पेन तिनें पाहिलें, तेव्हां तिला आश्चर्य वाटलें. पेन पाहिल्यावर नीलाहि सद्‌गदित झाली.

० ० ० ०

'आई, एक नवी गोष्ट सांग ना !' नीला आपल्या आईला म्हणाली.

नीलाच्या आईनें तिला जवळ ओढलें, तिच्या गालाचा

एक मुका घेतला अन् ‘ माझ्या लाडोबाला झोंप नाहीं का येत ?’ असें म्हणून तिनें तिला नवी गोष्ट सांगायला सुरवात केली—

‘ फार वर्षांपूर्वी डेन्मार्क देशांत एक गरीब शेतकरी रहात होता. त्याला स्वेंद नांवाचा एक मुलगा होता.

‘ एकदां त्या देशांत फार दुष्काळ पडला. शेतकऱ्यापाशीं असलेला सारा पैसाअडका खाण्यापिण्यांत खर्च झाला. ज्यावेळीं सारा पैसा संपून गेला, त्यावेळीं तो शेतकरी शहरांत कांहीं-तरी रोजगार मिळविण्यासाठीं आपली बायको नि आपला मुलगा यांना बरोबर घेऊन आपल्या घरांतून बाहेर पडला.

‘ तीं तिघेंहि एका जंगलांतून जात होतीं, इतक्यांत फार मोठें वादळ सुरू झालें अन् वादळांत सांपडल्यामुळें तीं तिघेंहि एकमेकांपासून अलग झालीं. त्यांची परस्परांशीं ताटातूट झाली.

‘ त्यांनीं बराच प्रयत्न केला, तरी तीं तिघेंहि एकमेकांना भेटलीं नाहींत. तो शेतकरी आपली बायको नि आपला मुलगा यांना शोधीत असतां त्याला एक ठेंगू भेटला. त्या शेतकऱ्यानें त्याला विचारलें, ‘ माझी बायको नि माझा मुलगा हीं तुला दिसलीं का कुठें ? त्यांची नि माझी वादळामुळें ताटातूट झाली आहे. ’

त्यावर तो ठेंगू म्हणाला, ‘ नाहीं बुवा दिसलीं मला ! ’

‘ त्या शेतकऱ्याला भूक लागली होती. शेतकऱ्यानें जेव्हां त्या ठेंगूला आपल्याला भूक लागल्याचें सांगितलें, तेव्हां त्या ठेंगूनें त्या शेतकऱ्याला आपल्या घरीं नेल्यावर त्याला दूध नि भाकर हीं खायला दिलीं. खाणें आटोपल्यावर तो शेतकरी

परत जाऊं लागला, तेव्हां त्या ठेंगूनें त्याला एक बटवा दिला नि सांगितलें, 'हा बटवा जादूचा आहे. तूं याच्यांतून कितीहि पैसे काढलेस, तरी हा नेहमीं भरलेलाच असेल !'

'शेतकऱ्यानें त्याचे आभार मानले नि तो जाऊं लागला, तेव्हां ठेंगू त्याला म्हणाला, 'पण त्याबरोबरच माझीहि एक अशी अट आहे कीं, तुझ्या मुलाला चौदावें वर्ष पुरें होतांच मी येणार नि त्याला घेऊन जाणार !'

'छे, छे, तुझी ही अडवणुकीची अट मी मुळींच मानणार नाहीं.' असें त्या शेतकऱ्यानें त्या ठेंगूला सांगितलें नि तो त्याचा बटवा त्याला परत देऊं लागला.

'तें पहातांच त्या ठेंगूला राग आला. तो त्या शेतकऱ्याला म्हणाला, 'जर तूं माझें सांगणें ऐकलें नाहींस, तर मी तुला इथल्या इथेंच ठार करीन. मी ठेंगू राक्षस आहें !'

'भीति वाटल्यामुळें तो शेतकरी लाचार बनला, निरुपायास्तव त्यानें त्या बटव्याचा स्वीकार केला.

'वादळामुळें त्या शेतकऱ्याची बायको नि त्याचा मुलगा हीं दोघें त्याच्यापासून अलग झालीं होतीं. तीं दोघेंहि त्या जंगलांतल्या एका साधूच्या आश्रमांत राहिलीं. त्याची सतत सेवा केल्यामुळें तो साधु शेतकऱ्याच्या बायकोवर प्रसन्न झाला नि तिला म्हणाला, 'तुझा हा पुत्र वीर नि साहसी होईल अन् एका राजकन्येशीं त्याचें लग्न लागेल असा मी आशीर्वाद देतों.'

'कांहीं वर्षांनंतर त्या साधूनें शेतकऱ्याची बायको अन् त्याचा मुलगा यांना शेतकऱ्याकडे पोहोंचतें केलें. आपली बायको नि आपला मुलगा यांची पुन्हां भेट झाल्यामुळें तो

शेतकरी आनंदित झाला. त्या बटव्यामुळें तो शेतकरी आतां फार मोठा धनिक बनला होता.

'आपल्या मुलीचें लग्न स्वेंदशीं—एका कुणब्याच्या मुलाशीं होणार आहे असें जेव्हां राजाला कळलें, तेव्हां राजाला राग आला नि त्यानें स्वेंदला एका पेटींत बंद केल्यावर ती पेटी समुद्रांत सोडून दिली; पण स्वेंदच्या सुदैवानें ती पेटी एका सावकाराला सांपडली. त्यानें ती उघडून स्वेंदला तिच्यां-तून बाहेर काढलें.

'दिवस निघून गेले नि स्वेंदचा चौदावा वाढदिवसहि आला !

'त्याच्या वाढदिवशीं तो ठेंगू राक्षस स्वेंदला नेण्यासाठीं त्या शेतकऱ्याच्या घरीं आला; पण त्याला तिथें स्वेंद सांपडला नाहीं, म्हणून तो त्या शेतकऱ्याला घेऊन तिथून निघून गेला.

'योगायोगानें त्याच दिवशीं त्या राजाची मुलगीहि बेपत्ता झाली. तिच्यावर राजाचें अतिशय प्रेम होतें, म्हणून 'जो कोणी माझ्या मुलीचा तपास लावील, त्याच्याशीं मी तिचें लग्न लावीन नि वरदक्षणेदाखल मी त्याला माझें अर्धे राज्य देईन अशी त्या राजानें घोषणा केली.

'त्याच दरम्यान स्वेंद नि त्याची आई यांची परस्परांशीं गांठ पडली. दोघांनींहि एकमेकांना ओळखलें नि एकमेकांच्या गळ्यांना मिठ्या मारल्या.

'आपल्या बापाला ठेंगू राक्षसानें उचलून नेल्याचें जेव्हां स्वेंदला त्याच्या आईकडून कळलें, तेव्हां त्याला अतिशय चीड आली. त्याच्या आईनें मनाई केली असतांहि तो त्या राक्ष-साच्या शोधासाठीं घरांतून बाहेर पडला.

'पण राक्षस कुठें रहातो तें स्वेंदला ठाऊक नव्हतें !

चालतां चालतां तो थकला नि विश्रांति घेण्यासाठीं एका झाडाच्या सांवलीला बसला. कांहीं वेळानें समोरून एक म्हातारी जात असल्याचें त्यानें पाहिलें. म्हातारपणामूळें तिच्या कंबरेची कमान झाली होती नि तिनें आपल्या पाठीवर लांकडाची मोळी घेतली होती.

'तिची ती अगतिक अवस्था पाहिल्यावर स्वेंदला तिची दया आली! तो तिला म्हणाला, 'आण आजी, तीं लांकडें मी तुझ्या घरीं घेऊन येतों.'

'त्या म्हातारीनें ती मोळी स्वेंदच्या हवालीं केली. स्वेंद हा एका राक्षसाशीं लढण्यासाठीं जात आहे असें जेव्हां तिला कळलें तेव्हां तिनें त्याला थोपवून धरण्याचा प्रयत्न केला; पण स्वेंद तिचें म्हणणें ऐकायला तयार झाला नाहीं.

'अखेर ती म्हातारी त्याच्यावर खूष झाली नि तिनें त्याला एक पिशवी दिली. त्या पिशवींत अस्वलाचा एक केंस, माशाची एक कातडी नि पांखराचें एक पीस, अशा तीन वस्तु होत्या. अस्वलाचा केंस दाबला कीं अस्वलांचा राजा, माशाची कातडी दाबली कीं माशांची राणी अन् पांखराचें पीस दाबल्यावर पक्ष्यांचा राजा अशीं समोर प्रकट होत असत! तो ठेंगू राक्षस ज्या बेटांत रहात होता, त्या बेटाचा पत्ताहि त्या म्हातारीनें स्वेंदला सांगितला.

'स्वेंदनें ती पिशवी घेतली नि तो चालत चालत एका जंगलांत गेला. त्यानंतर परीक्षा पहाण्यासाठीं त्यानें त्या पिशवींत असलेलें माशाचें कातडें दाबलें. लगेच माशांची राणी त्याच्यापुढें येऊन उभी राहिली नि नम्र स्वरांत त्याला म्हणाली, 'आज्ञा हुजूर?'

'स्वेंदचा विचार ऐकतांच ती राणी पहिल्यानें घाबरली, तथापि त्याचें धैर्य नि धाडस या दोन गोष्टी लक्षांत घेऊन ती त्याला म्हणाली, 'त्या ठेंगू राक्षसाला एका विशिष्ट तलवारीनेंच ठार करतां येईल अन् ती तलवार पर्वतांच्या राजाच्या महालांत सुरक्षित ठेवलेली आहे.'

'त्यानंतर स्वेंदनें अस्वलाचा केंस दाबला; त्याबरोबर अस्वलांचा राजा त्याच्या पुढ्यांत येऊन उभा राहिला! स्वेंदनें त्याला पर्वतांच्या राजाच्या महालांत घेऊन जाण्याबद्दल सांगितलें नि तो त्याच्या पाठीवर बसल्यानंतर दुसऱ्याच क्षणांत त्या महालांत जाऊन पोहोंचला.

'त्यानें तिथली तलवार हस्तगत केल्यावर पुन्हां माशांच्या राणीला बोलावलें नि तिच्या मदतीनें तो ठेंगू राक्षसाच्या बेटावर जाऊन थडकला!



'बेटावर उतरतांच त्या ठेंगू राक्षसानें त्याला पाहिलें. दोघांच्यांत घनघोर युद्ध झालें. स्वेंदनें तिथल्या सगळ्या राक्षसांना ठार मारलें नि आपल्या बापाला सोडविलें. त्या राक्षसाच्या कैदेंत असलेल्या राजकन्येला पहातांच स्वेंदला आश्चर्य वाटलें ! त्या ठेंगू राक्षसानें ज्यावेळीं स्वेंदच्या बापाला पकडून नेलें होतें, त्याचवेळीं त्यानें त्या राजकन्येलाहि पकडून आपल्या बेटांत नेलें होतें !

'राजानें घोषणा केल्याप्रमाणें आपल्या कन्येचें लग्न स्वेंदशीं लावलें नि वरदक्षणेदाखल त्याला आपलें सारेंच राज्य देऊन टाकलें.'

झोंप येईनाशी झाली, कीं नीला आपल्या आईजवळ नवीनवी गोष्ट सांगण्याचा हट्ट धरी नि तिचा तो हट्ट तिची आई पुरा करी !

° ° ° °

नीलाला आज पडलेलें स्वप्न तिला अतिशय आवडलें होतें अन् तोंडांत पडलेला रसगुल्ला चाखावा, त्याप्रमाणें ती त्या गोड स्वप्नाची चव चाखत होती ! चप्–चप्–चप् !

ती आपल्या खोलींतल्या कॉटवर झोंपली होती नि तिच्या आईनें तिच्या केंसांवरून प्रेमानें हात फिरविल्यामुळें स्वप्नांतच ती जागी झाली होती.

'आई, आलीस तूं ?' नीलानें डोळे चोळतां चोळतां तिला विचारलें.

'होय, आलें. तूं रोज रोज माझी आठवण काढतेस ना ? म्हणून मी आज आलें !' आईनें सांगितलें.

'आई, मी रोज तुझी आठवण काढीत असें, तें तुला

तिकडे कळत होतें ?' नीलानें विस्मयचकित होऊन आपल्या आईला विचारलें.

'होय, माझी नीला माझी आठवण काढीत असल्याचें मला लगेच कळत होतें !'

'मग तूं आतांपर्यंत आलीस कां नाहीं ?'

'वेळ मिळाला नाहीं बाळे !'

'हुं: ! तिथेंहि तुला वेळ मिळत नव्हता ?' नीलानें आपलें तोंड वांकडें केलें नि पुन्हां आपल्या आईला विचारलें, 'आई, तुला पांढऱ्या कपड्यांत गुंडाळून दोरीनें बांधल्यावर बाबा तुला कुठें घेऊन गेले होते ?'

असें म्हणून ती आपल्या आईच्या कुशींत शिरली !

'फारच दूर !' आईनें सांगितलें.

'मग तूं आतां आलीस कशी ?' नीलानें विचारलें.

'आपसुकच आलें !' आई म्हणाली.

'आतां जाणार नाहींस ना परत ?'

'नाहीं ! कध्धींच नाहीं ! आतां मी तुझ्यापाशींच रहा-णार !' असें म्हणून ती नीलाचें केंस कुरवाळूं लागली ! तिच्या हस्तस्पर्शामुळें नीलाचें सारें अंग पुलकित झालें !

'आई, तूं मला मारणार नाहींस ना ? माझ्याकडून कधीं चूक झाली, तर बाबांकडे तक्रार करून त्यांच्याकडून मला पिटायला लावणार नाहींस ना ?'

'नाहीं ग नीलू ! मी तुला कधींहि दटावणार नाहीं अन् तुझ्याविरुद्ध कधीं कागाळीहि करणार नाहीं तुझ्या बाबांकडे !'

'आई, मी रहाणार नाहीं इथें !'

'कां ग ?'

'इथें माई मला मारीत असते रोज !'

'तूं तिला राजी राख ! तिच्या इच्छेविरुद्ध वागूं नकोस तिच्याशीं.'

'माई मला विनाकारण मारीत असते ! ती आमच्या गल्लींतली आजी आहे ना ! अगदीं म्हातारी ! जिचे सारे केंस पिकून पांढरे झाले आहेत, ती आजी मात्र फारच चांगली आहे हं ! माई मला मारायला लागली, कीं, मी धांवत त्या आजीपाशीं जातें. ती माझ्यावर फारच प्रेम करते नि चांगलें चांगलें खायलाहि देते ! तिनें पिंजऱ्यांत पाळलेली मैनासुद्धां फारच चांगली आहे. तीहि माझ्यावर माया करते. तूंहि चल त्यांच्या घरीं !'

बोलतांबोलतां दमल्यामुळें नीला थोडा वेळ थांबली नि पुन्हां आपल्या आईशीं बोलूं लागली, 'आमचे बाबाहि हल्लीं अगदींच वाईट्ट झाले आहेत. ते पूर्वीसारखे माझे लाड करीत नाहींत नि माझ्याशीं नीट बोलतहि नाहींत. अनूपला रोज बाजारांत फिरायला नेतात नि त्याला चांगल्या चांगल्या वस्तु घेऊन देतात...आई, ती चंपी आहे ना ? अनूपच्या मावशीची मुलगी ? ती मोठी चहाडखोर आहे ! त्या दिवशीं तिनें माई कडून मला मारविलें ! मी नितीनकडे कैऱ्या मागितल्या नि त्या खाल्ल्या असें तिनें माईला खोटेंच सांगितलें ! मी कुणा-कडून कसलीहि वस्तु मागून खात नसतें कधीं ! दुसऱ्याकडे मागणें ही गोष्ट वाईट नाहीं का ? त्यानंतर मी त्या चंपीटलीशीं खापिटलीशीं झगडलें ! तूंहि तिच्याशीं बोलूं नकोस ! आई, पूर्वी जशी करीत होतीस, तशी आतांहि माझी बर्थ-डे पार्टी

करशील ना ? अनूपची बर्थ–डे पार्टी या खेपेला मोठ्या थाटामाटांत झाली ! माईनें लाउड स्पीकर आणला होता. त्याच्यावर चांगलीं चांगलीं गाणीं गायिलीं गेलीं होतीं. त्यांतले एक गाणें लक्षांत आहे माझ्या, तें मी म्हणतें ऐक–

पतंगा, पतंगा, जरा थांबतोस का ? ।
माझा निरोप सांगतोस का ? ।।
आकाशांतल्या चांदोबाला ।
ये माझ्या वाढदिवसाला ।।
उद्यां आहे जेवणखाण ।
येतांना सारे तारे आण ।।
आहे कीं नाहीं युक्ती सोपी ।
काढुन घेऊं त्याची टोपी ।।

'आई, माझे सारे कपडे फाटून गेले !' नीलानें तक्रार केली !

'मी आज बाजारांतून तुला चार फ्रॉक्स आणतें; पण तुला भूक लागली आहे का ?' आईनें नीलाला विचारलें.

'फारच आई !'

'काय खाणार तूं ?' आईनें स्वयंपाकघरांत जातांजातां विचारलें.

'काय देशील तें खाईन !'

'घे, खा ! पेढे आवडतात ना तुला ?' असें म्हणून तिच्या आईनें तिला दोन पेढे दिले.

'आई, मी डॉक्टर होणार !' नीला आपल्या आईला म्हणाली.

आईनें तिला तसें आश्वासन दिल्यावर विचारलें, 'पण तूं डॉक्टर झाल्यावर माझ्याकडून फी नाहीं ना घेणार ?'

'छे, मी गरिबांकडून फी घेणार नाहीं !' नीलानें सांगितलें.

– अन् फरशीवर आरसा आदळतांच त्याचा चक्काचूर होतो, तसा नीलाच्या त्या गोड स्वप्नाचा चक्काचूर झाला ! ती झोंपेंतून जागी झाली !

# दोन

नीलाचा धाकटा सावत्रभाऊ अनूप हा कॉटवर झोंपला होता. तो जागा झाल्यावर त्याला तहान लागली म्हणून तो जवळच्या माठांतलें गार पाणी प्याला.

सारसबागेनजीकच्या क्रीडांगणावर खेळांची गर्दी होती. तिथें निरनिराळ्या संघांतर्फे खेळ चालू होते. माईहि हातांत रॅकेट घेऊन मैदानांत जात असे.

नीलाची नजर घड्याळाकडे गेली. घड्याळांत चार वाजले होते.

नीला चपापली ! माई आली असावी असें तिला वाटलें ! माईची याद येतांच तिचा उग्र चेहरा तिच्या नजरेसमोर नाचूं लागला !

आपल्या कानांत कुणीतरी रेकॉर्ड प्लेअर ठेवला आहे अन् आतां तो चालूं होणार अशी तिची कल्पना झाली ! तिच्या कानांत शब्द घुमूं लागले,–

'काळतोंडी कुठची, आपल्या आईला मारून टाकलें अन् आतां मला मारून टाकण्यासाठीं आपण जिती राहिली आहे! आपल्या आईसोबत का नाहीं गेली? कांहीं काम करीत नाहीं कीं कांहीं उद्योग करीत नाहीं. केवळ खायला काळ नि धरणीला भार अशी आहे! या गुळाच्या गणपतीला मखरांत बसवा नि दोन्ही ठाव नैवेद्याचें ताट हिच्या पुढ्यांत आदळा! आत्तांच सरळ करतें हडळीला!'

–अन् हातांत वेताची छडी घेऊन माई आपल्याला मारायला आली आहे असें नीलाला वाटलें. ती, पूर्वीं तिचे बाबा वापरीत होते ती वेताची छडी! जणूं आपल्याला मारण्यासाठींच त्यांनीं ती राखून ठेवली आहे अशी तिची कल्पना झाली नि ती हुंदके देऊं लागली!

पुरतें उजाडलें नाहीं तोंच नीलाच्या तोंडावरची चादर माईकडून खस्सकन ओढली जाते नि नंतर तिच्या भूपाळ्यांना सुरुवात होते–

'भीकमागी मेली! ही काय झोंपायची वेळ? आळसोबा आहे आळसोबा! खिडकींतून उन्हें आंत आलीं, तरी ही डारडूर झोंपलीच आहे. कॉटवर चहा आणून द्यायला हवा महाराणीला! सकाळीं उठून इथला केर काढला नाहीं कीं कसलें काम केलें नाहीं इतर! कुलक्षणी कार्टी कुठची! एक गोष्ट हिला हज्जारदां समजावून सांगावी लागते!'

आपल्या गालांवर माईच्या हातच्या चापट्या बसूं न देण्यासाठीं नीला झटकन् उठते. बिछाना गुंडाळून ठेवल्यावर ती माजघरांत जाऊन तिथला केर काढूं लागते. त्यानंतर चुलींत

विस्तव पेटविते नि मोलकरीण येईस्तोंवर खरकटीं भांडीं घांशीत बसते !

‘ही चप्पल कशी तुटली ?– आतां तूं अनवाणी शाळेंत जा !’ माईच्या मुखांतून मुक्ताफळें बाहेर पडतात !

बाहेर वाळत घातलेल्या कपड्यांपैकीं एखादा कपडा वानरानें पळविला, तर नीलावर आली आपत्ति ! ‘भारी किमतीचा होता तो बुशशर्ट ! हे बिचारे कुठें कुठें हिंडून फिरून आपल्या मुलांचे लाड पुरवीत असतात; पण या डाकिनीला जरासुद्धां पर्वा नाहीं. दोन्ही ठाव मजेंत खायला मिळतें ना ! आपले कपडे असते तर उचलून आणले असते हिनें; पण तो बुशशर्ट अनूपचा होता ना ? मग ही कसा उचलून आणील तो ! अनूपविषयीं हिच्या पोटांत किती तिरस्कार भरला आहे कुणास ठाऊक ! रांड मेली असती तर बरें झालें असतें; पण माझा वंश वाढविण्यासाठीं ही जिती राहिली आहे. थांब, कुणा आंधळ्या, पांगळ्याच्या गळ्यांत तुला बांधलें नाहीं, तर नांवच बदल माझें !’– अन् त्यानंतर सारा दिवस माईच्या तोंडाचा पट्टा अविरत चालूं असायचा !

नीला कधीं साबणाची वडी घेऊन आपले कपडे धुवूं लागली, तर लगेच माईची ओरड सुरू होत असे– ‘हिला रोजच्या रोज साबणाच्या वड्या लागतात. महाराणीनें परवांच तर आपले कपडे लखलखीत केले होते अन् दोन दिवस झाले नाहींत तोंच ते मळून गेले ?’

‘इतक्यांत वेळ झाली शाळेंत जाण्याची ? राजकन्येसारखी नटूनथटून जाते आहे शाळेंत. शाळा उघडण्यापूर्वीं

बाकीच्या पोरींत मिसळून त्यांच्यासह धांगडधिंगा घालायचा असेल शाळेबाहेर ?'

अशा प्रकारें माई नीलाला रोज बोलत असे नि शाळेंत यायला उशीर झाल्याबद्दल तिला वर्गाच्या बाईकडून रोजच्या रोज मार खावा लागत असे. नीलाला शाळेंत यायला उशीर होतात, अशी तक्रार शाळेच्या बाईकडून आली, तर माई धुणीं वाळत घालण्याची काठी नीलावर उगारी नि म्हणे, 'का ग अवदसे, वाटेंत रोज कुठें थांबत असतेस ?'

शाळेंतून घरीं यायला थोडासा उशीर झाला तर माई तिला धमकावी, 'थांब तूं ! येत्या वर्षापासून तुझी शाळा बंद ! या दोन महिन्यांत जितकी मजा मारायची असेल, तेवढी मारून घे !' असें म्हणून ती तिचे दोन्ही कान आपल्या दोन्ही हातांनीं पिरगळीत असे.

नीला सहामाही परीक्षेंत पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण झाल्यामुळें तिच्या बाबांनीं तिला बक्षिसादाखल एक सुंदर फाउंटन पेन दिलें. तें पेन पहातांच नीला फारच खूष झाली. तिनें तें पेन आपल्या पुस्तकांच्या पिशवींत ठेवलें नि ती मनांत म्हणाली, 'मी उद्यां सकाळीं हें पेन घेऊन जाणार; पण तें कुणालाच दाखविणार नाहीं. लीलाला तर माझ्याकडे पेन असल्याचें कळूंहि देणार नाहीं. गेल्या आठवड्यांत तिनें माझें एक पुस्तक चोरलें होतें. मार मिळाल्यावर विद्येची शपथ घेऊन नि आपले दोन्ही हात जोडून मला सांगत होती, 'नीलाताई, मी तुझ्या पुस्तकाला शिवलेंसुद्धां नाहीं.' कशी मगरीसारखी नक्राश्रु ढाळीत होती !'

'अरे हो, माईला हें पेन मी दाखविलें नाहीं अजून !'

असा मनांत विचार केल्यावर ती धांवत–पळत स्वयंपाकघरांत गेली !

‘ माई, माई, हें पहा पेन ! बाबांनीं मला आणतों म्हणून सांगितलें होतें ना ?– किती छान आहे. ’ नीलाच्या आनंदाला पारावार उरला नव्हता.



माईनें तें पेन पाहिलें नि आपल्या जवळ ठेवून दिलें.

त्यानंतर ती नीलाला म्हणाली, ‘ तूं लहान आहेस अजून. मोठी झालीस म्हणजे हें मी तुला देईन. लहान मुलांनीं फाउंटन पेनानें लिहिण्याचा सराव केला, तर त्यांचें हँडरायटिंग बिघडतें ! ’

नीला कांहीं न बोलतां स्वयंपाकघरांतून बाहेर आली.

अन् दुसऱ्या दिवशीं माईनें तेंच पेन आपल्या मुलाला, नीलाच्या धाकट्या सावत्रभावाला– दिलें. नीलानें माईला

कांहींच विचारलें नाहीं. तिनें मनांत विचार केला, ‘ विचारायचें काय त्यांत ?’

तितक्यांत नीलाच्या वर्गांतली वासंती नांवाची एक मुलगी तिथें आली नि माईला म्हणाली, ‘ आंटी, नीला शाळेंत सर्वांशीं भांडत असते. तिच्या वर्गांतल्या मुलींशीं तिचा वारंवार झगडा चालूं असतो. गेल्याच आठवड्यांत लीलाशीं हिचा मोठा झगडा झाला. हिनें तिचें पुस्तक कुठेंतरी लपवून ठेवलें होतें म्हणे !’

‘ कां ?’ असें म्हणून माईनें नीलाला बोलावून आणलें अन् तिला तसें करण्याचें कारण विचारलें.

‘ नाहीं माई, मी कशाला तिचें पुस्तक लपविणार ?’

त्यावर वासंती म्हणाली, ‘ नाहीं आंटी ! हिनेंच लपवून ठवलें होतें. नीलानें माझें पुस्तक चोरलें असें तिनें बाईंना सांगितलें, तेव्हां हिच्या पुस्तकांची पिशवी तपासण्यांत आली; पण त्यानंतर तें पुस्तक दुसरीकडे कुठेंतरी सांपडलें !’

‘ तूं फारच चांगली आहेस ! सर्वांकडे चिंचा मागून खातेस !’ नीला वासंतीवर चिडली.

‘ होय, खातें ! तुला कुणी देत नाहीं म्हणून चिडतेस अशी !’ वासंती नीलाला म्हणाली.

‘ मी कांहीं तुझ्यासारखी भीकमागी नव्हे !’ नीला म्हणाली.

‘ नीला !’ असें म्हणून माईनें तिच्या पाठींत दोनतीन रट्टे दिले.

तें पाहून वासंतीला आसुरी आनंद झाला. त्यानंतर ती आपल्या घरीं गेली नि दुसऱ्या दिवशीं तिनें ती गोष्ट साऱ्या

वर्गभगिनींना सांगितली.

त्या दिवसांत अनूपहि चढेल बनला होता नि आपल्या आईसारखी हुकूमशाही गाजवीत होता नीलावर. ‘ पाणी काढून दे आंघोळीला लौकर !’ ‘ माझे कपडे कुठें ठेवलेस ?’ ‘आंघोळीची वेळ झाली तें ठाऊक नाहीं तुला ?’ ‘ झटपट कपडे आणून दे !’ ‘ उभी काय राहिली आहेस ?’

अन् मग तो आपल्या आईकडे तक्रार करी, ‘ आई, हिनें मला अजून न्हाऊं घातलें नाहीं. ’

अनूपनें तक्रार केल्यावर माई मग नीलाला वाटेल तसें बोलत असे.

पेन्सिल उंदरानें पळवून नेली अन् अनूपनें आपल्या आईला नीलाचें नांव सांगितलें !

पुस्तक कुठेंतरी हरवलें, बिचाऱ्या नीलावर आळ आला.

माई वेताची छडी घेऊन आली नि तिनें नीलाला छडीनें फोडून काढलें.

थोड्या वेळानें पेन्सिल नि पुस्तक हीं दोन्ही अनूपच्या पिशवींत सांपडलीं; पण माई कांहींच बोलली नाहीं. ती हंसली फक्त.

त्या दिवशीं तर मोठाच अनर्थ घडला !

अनूपनें आपल्या आईला सांगितलें, ‘ आई, माझ्या पशांच्या पाकिटांतली एक रुपयाची नोट कुणीतरी काढून घेतली !’

माईनें पाकीट उघडून पाहिलें. खरोखर एक रुपया कमी होता त्याच्यांत.

माई मनांत विचार करूं लागली, 'रुपया कुणी नेला असावा बरें? बाहेरचा कुणीहि इसम घरांत आलेला नाहीं. नीलाच फक्त आहे घरांत. बस्स, नीलानेंच ती नोट चोरली असली पाहिजे!'

अन् नीलाच्या नांवानें शंख करायला चांगली संधि सांपडली तिला.

माईनें तिला भिंतीपाशीं उभें केलें, एका हातानें तिचे केंस पकडले नि दुसऱ्या हातानें तिच्या पाठीवर बुक्क्या मारतां मारतां तिनें तिला विचारलें, 'बोल, काय केलेंस त्या रुपयाचें? काय काय आणून खाल्लेंस?'

'मी रुपया पाहिलासुद्धां नाहीं माई!' नीलानें रडत रडत सांगितलें.

माईनें तिचे दोन्ही हात दोरीनें बांधले होते, त्यामुळें तिला आपले अश्रूहि पुसतां येत नव्हते.

'बोल!' माईनें नीलाचें डोकें भिंतीवर आपटलें नि ती तिला म्हणाली, 'सांग, याउपर करशील का कधीं चोरी?'

त्यानंतर माईनें तिचें डोकें आपल्या दोन्ही पायांच्यामध्यें दाबून धरल्यावर ती तिच्या पाठीवर जोरानें भराभर बुक्क्या मारूं लागली नि बुक्क्या मारतां मारतां म्हणाली, 'सांग रांडे, माझ्या नांवाला काळोखी फांसशील का?'

त्यानंतर ती नीलाच्या गालांवर थपडा मारूं लागली. मारामुळें नीला अखेर माईच्या पायांवर कोसळली. तिनें तिचे बांधलेले हात सोडले नि स्वयंपाकघरांत जातां जातां तिच्यावर दोनतीन लाथा मारल्या.

नीलाचे बाबा कचेरींतून घरीं आल्यावर माईनें त्यांच्याकडे नीलाविरुद्ध तक्रार करतांच ते म्हणाले, ‘ती नोट मीच तर काढून नेली होती.’

त्यावर माई भडकली नि त्यांना म्हणाली, ‘मुलांना माझ्याकडून मिळणारा मार चुकविण्यासाठीं तुम्ही असें खोटें बोलत असतां नेहमीं!’

पण नीलाचे बाबा त्यावर कांहींच बोलले नाहींत.

एकदां तर अनूपनें स्वतःच घरांतली एक अधेली चोरली अन् आपल्या दोस्तांसह बर्फ खाल्ला!

माईनें नीलाची मारून मारून पाठ फोडल्यावर संजय नांवाचा अनूपचा एक दोस्त तिथें आला नि माईला म्हणाला, ‘माई, अनूपनें आज आम्हा सार्‍यांना बर्फ खायला दिला! अनूपला आपण अधेली दिली होती ना? त्या अधेलीचा त्यानें बर्फ विकत घेतला...’

अनूप हंसूं लागला.

माईनें त्याच्याकडे एकदां डोळे वटारून पाहिलें नि त्याच्यासारखी तीहि हंसूं लागली.

मार खाल्ल्यामुळें बिचारी नीला मात्र रडत होती त्यावेळीं!

# तीन

घर फिरलें म्हणजे घराचे वांसेहि फिरतात, तशी नीलाची अवस्था झाली ! तिची आई वारल्यावर, सावत्र आई घरांत आल्यावर अन् अनूपचा जन्म झाल्यावर नीलाचे बाबा-सुद्धां बरेच बदलले !

ते पूर्वीं तिच्यावर फार प्रेम करीत होते. तिला कधीं मारीत नव्हते. तिच्या प्रत्येक वर्थ-डेला तिच्यासाठीं नवे कपडे शिवीत होते !

पण आतां ?

नीलाचा जन्म पंचवीस जानेवारीला झाला होता, ही गोष्टहि जणु ते विसरले. त्यांना तिच्या जन्मदिनाची याद राहिली नाहीं.

नीलाचे बाबा पूर्वीं तिला हांक मारतांना ' नीलू, नीलू ' अशा लाडक्या नांवानें हांक मारीत; पण तेच तिचे बाबा आतां ' नीला, नीला ' म्हणून तिच्या नांवानें ओरडूं लागले !

अन् माईनें त्यांना तिच्याविरुद्ध कांहीं सांगितलें, तरी त्याची शहानिशा न करतां तिला मारून मारून तिच्या पाठीचीं धिरडीं करूं लागले!

अनूपनें चहाची किटली फोडली. नीलानें ती फुटकी किटली बाहेर नेऊन टाकण्यासाठीं उचलली, तोंच अनूप तिच्या पाठीमागून धांवत आला नि त्यानें त्या किटलीला हात घातला. नीलाला ती किटली सोडून देणें भागच पडलें.

अनूप किटली घेऊन पळूं लागला; पण पळतां पळतां तो खांबाला आपटला नि त्याचा पाय खरचटला. किटलीहि फुटली नि अनूपच्या पायालाहि जराशी जखम झाली! बाबाहि गेले नि पुडवेंहि गेलें!

माई त्यावेळीं कांहींच बोलली नाहीं; पण नीलाचे बाबा घरीं आल्यावर ती त्यांना म्हणाली, 'तुमच्या लाडक्या लेकीनें चिनी मातीची नवी किटली फोडून टाकली. अनूपच्या पायाला तर एवढी मोठी जखम झाली आहे, कीं भरून यायला महिनेच्या महिने लागतील!'

नीलाचे बाबा त्यावेळीं फारच त्रासलेले दिसत होते. कदाचित त्या दिवशीं त्यांचा त्यांच्या बॉसशीं झगडा झाला होता कीं काय कुणास ठाऊक! त्यांनीं मागचा पुढचा विचार न करतां नीलाला हातांतल्या छत्रीच्या काठीनें बडव, बडव बडविलें. अखेर ती काठीहि मोडून गेली.

माई अशा संधीची वाटच पहात असते. नीलाच्या बाबांचें टेंपरेचर वाढल्याचें पाहिल्यावर तिला नीलाविरुद्ध कागाळी करण्याची हुक्की येते! त्या दिवशीं तिनें नीला-विरुद्ध अशीच तक्रार केली, 'नीला तर माझा असा जीव खाते

कीं, तिला कितीहि सांगा नि कितीहि शिकवा, ती माझें सांगणें मुळींच ऐकून घेत नाहीं.'



अन् त्यावर नीलाचे बाबा किंचाळले, 'कुठें आहे ती हडळ? तिला बोलाव इकडे. मी तिला आतां विहिरींतच ढकलून देतों!'

त्या दिवशीं नीलाच्या बाबांनीं नीलाला कॉटवरून उचललें अन् खालच्या फरशीवर आदळलें.

ती अनूपच्या खोलींत अभ्यासाचें पुस्तक वाचीत बसली होती. माई तिथेंच बसून भाजी चिरीत होती. अनूपची मावशीहि आली होती त्या दिवशीं! अनूपनें रेडिओची तार ओढली. रेडिओ खालीं पडला नि त्याची केस फुटली. नीलाचे बाबा घरीं येतांच माईनें त्यांच्याकडे तक्रार केली कीं, 'रेडिओ फुटला! अनूप नि नीला हीं एकमेकांशीं झगडत होतीं.'

बस् ! नीलाच्या बाबांनीं नीलाला बेदम बडविलें.

अनूपच्या मावशीनें तिला आपल्या कुशींत ओढलें नि ती माईला रागानें म्हणाली, 'आईवेगळ्या पोरक्या पोरीला असें गुरासारखें मारतांना तुम्हांला लाज नाहीं कशी वाटली ? तार ओढली अनूपनें अन् मार मात्र पोरक्या पोरीला ! ...' अन् ती माईशीं खूप भांडली.

त्यानंतर अनूपची मावशी माईच्या घरीं आली नाहीं अन् माईहि आपल्या बहिणीच्या घरीं गेली नाहीं कधीं !

✦ ✦

## चार

'अरेरे ! वारली बिचारी ! किती चांगली होती आजी !'

नीलाला माईच्या निष्ठुरतेबरोबरच आजीच्या प्रेमळ-पणाची याद आली.

किती चांगली होती आजी ! बाजूच्याच घरांत रहात होती ती. जेव्हां माई नीलावर रागावे, तेव्हां ती नीलाला आपल्या घरीं घेऊन जाई अन् तिला समजावून सांगे, 'हें पहा नीला, माई तुझ्याशीं कशीहि वागो, तूं तिला कांहींसुद्धां बोलूं नकोस. तीहि तुझी आईच आहे !'

'पण आजी, आई इतकी कठोर नसते कांहीं ! एकदां आम्ही शाळेंतल्या सार्‍या विद्यार्थिनी आचार्य अत्र्यांचा 'श्यामची आई' हा बोलपट पहायला गेलों होतों; पण त्या बोलपटांतली आई आपल्या दोन्ही मुलांवर सारखेंच प्रेम करीत होती !' नीला आजीला म्हणाली.

त्यावर आजी म्हणाली, 'तूं म्हणतेस तें खरें आहे नीला; पण सगळ्याच आया कांहीं सारख्या नसतात!'

नीला आजीच्या घरीं खूप खूप खेळे. तिची खोलीहि झाडी.

नीलानें तसें केलें कीं आजी म्हणे, 'आमची नीला आतां फारच समजदार झाली हं!' असें म्हणून ती नीलाला आपल्या कुशींत ओढी नि तिचे पटापट मुके घेई! त्यानंतर ती तिच्या तळहातांचीं चुंबनें घेई नि लगेच चपापे! भांडीं घासून घासून तिच्या तळव्यांवर पडलेल्या चिरांकडे तिची नजर खिळून राही! आजी कांहीं बोलत नसे; पण आपल्या डोळ्यांतलीं आंसवें ती लुगड्याच्या पदरानें पुशी! नीलाला त्यांतलें कांहींच कळत नसे!

'आजी, मी जाऊं आतां? नाहींतर माई माझ्यावर रागावेल!'

'हं, जा बाळे; पण माईला दुरुत्तरें देऊं नकोस नि दांडगाईहि करूं नकोस!' असें म्हणून आजी नीलाच्या कपाळा-वरून हात फिरवी. त्यावेळींहि आजीच्या डोळ्यांत अश्रु उभे रहात असत!

तें पाहून नीला तिला विचारी, 'आजी तूं कां ग रडतेस?'

पण आजी तिला कांहींच उत्तर देत नसे!

आजीच्या घरांत आणखीन् कुणी माणसें नव्हतीं. ती एकटीच होती.

नीलाचे बाबा तिला 'आत्या' म्हणत नि तिचा मान ठेवीत असत.

माईचें तिच्याशीं फारसें पटत नसे; तथापि ती आजीचा अनादरहि करीत नसे कधीं !

आजीनें नीलाला एकदां गोदास्नानासाठीं नाशिकला नेलें होतें. छकड्यांत बसल्यावर तिला अतिशय आनंद होत असे ! ती तिथें तीन दिवस होती; पण तिचे ते तीनहि दिवस मोठ्या मजेंत गेले होते ! जगांत सुखच सुख भरलें आहे असें त्यावेळीं तिला वाटत होतें ! ती तीन दिवस गोदेंत भरपूर न्हाली होती नि तिनें प्रत्येक दुकानांतून खाऊ विकत घेऊन खाल्ला होता. त्या तीन दिवसांत तिला तिची माई, तिचे बाबा नि तिचा अनूप या तिघांचीहि आठवण आली नव्हती !

पहांटेचे चार वाजल्यावर आजी तिला उठवीत असे. माईसारखी तोंडावरची चादर खसकन् ओढून नव्हे, अगदीं प्रेमळ स्वरांत. अन् ती तिला सांगे, 'नीलू, चल, गोदामाई बोलावते आहे आम्हांला !'

ती नीलाला नदीवर नेई. तिच्या बरोबर नीलाहि सरितास्नान करी नि त्यानंतर पंड्यासमोरच्या पाटावर बसून पूजा करी !

आजी पूजा करतां करतां नीलाच्या कपाळावरून हात फिरवी !

'असें केल्यानें काय होतें आजी?' नीला आजीला विचारी.

'तुझ्या कल्याणासाठीं देवाकडे मागणें मागतें आहें !' आजी तिला सांगे.

'कसलें मागणें मागतेस? मला तरी तें सांग ना !' नीला विचारी.



'तुझें लग्न होऊं दे नि तुला भरपूर सुख मिळूं दे!' असें म्हणून आजी हंसत असे!

'मुलांच्या डोक्यावरून हात फिरविल्यावर तीं खरोखरच वाढतात का?' नीला आजीला विचारी नि आजी होकारार्थी उत्तर देई!

नाशिकला असतांना आजी तिला रोज विचारी, 'नीला, आज कसला स्वयंपाक करूं? तुला काय हवें?'

अन् नीला आपल्याला काय हवें असेल तें तिला सांगे.

नीला तिथें असतांना कुठें गेली, कुणाशीं खेळली अगर तिनें कांहीं केलें तरी आजी तिच्यावर मुळींच रागावत नसे!

आजीनें तिला 'यमपुरी' नांवाचा एक मूक चित्रपट दाखविला होता. त्या चित्रपटांत चित्रगुप्त प्रत्येक माणसाकडून घडणाऱ्या बऱ्यावाईट कृत्यांचा 'जमाखर्च' असलेल्या चोपड्या कशा वाचतो, यमदूत पापी माणसांचीं शिरें करवतीनें कशीं कापतात, गुन्हेगारांना पेटत्या अग्निकुंडांत ढकलून कसें

जाळलें जातें, वगैरे भयानक दृश्यें होतीं !

'काय आजी, हें सारें खरें आहे का?' नीलाचा आजीला प्रश्न.

'मग काय खोटें आहे?' आजीचें हंसता हंसतां उत्तर.

आजी कधीं नीलासोबत बसली, कीं नीला तिला गोष्टी सांगण्याचा आग्रह करीत असे !

'आजी, जंगलांत नेल्यावर त्या सावत्र आईनें होरसचें पुढें काय केलें?'

'सावत्र आईनें त्याला एका अंधार कोठडींत कोंडून ठेवलें !'

'इतकी क्रूर होती का त्याची आई?' नीला आजीला विचारी.

'होय. ती तिला कधींतरी सुकेंरुखें कांहींतरी खायला देत असे. कधीं कधीं देतहि नसे नि खूप मारीत मात्र असे ! होरस कांहींच बोलत नसे ! फक्त 'आई आई!' म्हणून रडत असे. ती रोज संध्याकाळीं तिथें जाई नि खोलीचें कुलूप काढून दोन शिळ्या भाकरी खोलींत फेकी.'

'होरस कुठें आहे म्हणून त्याच्या बापानें तिला विचारलें नाहीं कधीं?'

'होरसच्या बाबतींत विचारण्याइतकी त्याच्या बापाला फुरसत कुठें होती? तो आपल्या कामांत गढलेला असे नि फावल्या वेळांत आपल्या इतर मुलांशीं खेळत असे !'

'देवानें त्यानंतर त्या सावत्र आईला कोणती शिक्षा दिली?'

‘ यमानें तिला आपल्या दूतांकडून दोरीनें बांधविलें नि खूप पिटविल्यावर तापलेल्या सळईनें चटके देवविले !’

‘ फारच चांगलें झालें. त्यानंतर अक्कल आली असेल बाईसाहेबांना. ’ नीला खूष होऊन म्हणे !

त्यावेळीं आजी नीलाच्या डोळ्यांतल्या बाहुल्यांकडे टक लावून पहात असे नि पहातां पहातां आपल्या मनांत कसला तरी विचार करीत असे !

✦ ✦

# पांच

आजीच्या मांडीवर झोंपलेली नीला आकाशांतील ताऱ्यांकडे टक लावून पाहूं लागली. जिकडे तिकडे झगमगते असंख्य तारे पसरले होते. सप्तर्षिमंडळ, आकाशगंगा, चकाकणारा तो ध्रुव तारा हे सारे तिला दिसत होते.

‘ आजी, तो तारा कोणता ?– अन् तो ?’

‘ पांच वर्षांच्या ध्रुवबाळानें तपश्चर्या कशी केली असेल ? अन् त्या त्याच्या तपश्चर्येमुळें विष्णु त्याच्यावर प्रसन्न झाला ?’

‘ आजी, कशी करतात ग तपश्चर्या ?’ नीलानें आजीला विचारलें.

‘ तपश्चर्या ? कां ग ?’ असें म्हणून आजीनें तिच्याकडे आपलें तोंड वळविलें.

‘ सहजच विचारलें मी !’ नीला शरमली.

‘ तपश्चर्या म्हणजे आपलें मन मारणें !’ आजीनें तिला टाळाटाळीचें उत्तर दिलें नि ती तिचे केंस कुरवाळूं लागली.

‘ ध्रुवबाळानें जंगलांत जाऊन तपश्चर्या केली होती ?’

‘होय !’ असें म्हणून आजीनें उशींत आपलें तोंड खुपसलें ! जणुं तिला ध्रुवबाळाच्या तपश्चर्येविषयीं पुढचें कांहीं बोलायचें नव्हतें.

‘मन मारणें म्हणजे तपश्चर्या का ? मीं तर आतांशा माझें मन मारलें आहे; मग ती तपश्चर्या नव्हे का ?’ नीला आपल्या मनांत विचार करूं लागली. तिच्या मनांत अनोळखी अशी एक पुलक जागृत झाली ! तिला अपरिचित असा आत्मविश्वास वाटूं लागला. तिच्या त्या तपश्चर्येमुळें कोण प्रसन्न होणार होतें ? विष्णु कीं माई ?

नीलानें त्या बाबतींत आजीला विचारलें, तेव्हां तिच्या प्रश्नाचें उत्तर देण्याऐवजीं आजीनें तिला एक नवी गोष्ट सांगायला सुरवात केली–

‘जोगेश्वरीच्या बोळांत दोघे उंदीर रहात होते. लहानच होते दोघे. त्यांतला एक द्वाड होता. गुलाबाच्या फांदीवरील कांट्यासारखा बोंचणारा, अर्थात् दुसऱ्यांना सतत सतावून सोडणारा अन् दुसरा अगदींच साधा होता. गुलाबाच्या फांदीवरील फुलासारखा सुगंधदायी अर्थात् दुसऱ्यांचीं मनें रिझविणारा असा होता. द्वाड उंदीर सारा दिवस कांहीं ना कांहींतरी द्वाडपणा करीत असे. त्याच्या टाळक्यांत नेहमीं वाईटच विचार घोळत असत ! जो साधा उंदीर होता, तो खरोखरच सरलस्वभावी होता. द्वाड उंदराच्या अगदीं नेमका उलटा ! द्वाड उंदराचें नांव होतें दिनू नि साध्या उंदराचें नांव होतें राजू.

‘दिनूच्या द्वाडपणामुळें त्या बोळांतलीं सारीं माणसें हैराण होऊन गेलीं होतीं ! दिनू आपल्या द्वाडपणाच्या बाबतींत

सहसा कुणालाच सोडीत नव्हता. मग ते टोपीवाले नाना राजिवडेकर असोत, तो नाक्यावरचा उडपी हॉटेलवाला शेट्टी असो नाहींतर जोगेश्वरीचा गुरव पुजारी असो, दिनूच्या लेखीं सारेच सारखे ! सब घोडे बारा टक्के !!

'एके दिवशीं नाना टोपीवाल्यांची ओरड सुरू झाली, 'त्या मेल्या मायझव्यानें माझी मफलर कुरतडून टाकली ! आज वीस वर्षें मी ती जिवापलीकडे जपून ठेवली होती !'

'नानांची ओरड हवेंत विरते न विरते, तोंच त्यांच्या घरांतली म्हातारी राजिवडेकरीण ओरडूं लागली, 'माझी जपाची माळ कुठें गेली ? त्या मेल्यानें नेऊन टाकली असेल आपल्या बिळांत ! तो राक्षस तर मला सारखा छळतो आहे ! देवाची वस्तुसुद्धां जाग्यावर ठेवीत नाहीं !'

'अन् नानांच्या नातवंडांनीं शोधाशोध केल्यावर ती जपाची माळ दिनू उंदराच्या बिळाच्या तोंडाशीं मिळाली, तेव्हां नानांचीं नातवंडें टाळ्या पिटून ओरडूं लागलीं, 'आतांशा दिनू उंदीरहि देवभक्त बनून जपजाप्य करूं लागला आहे !'

'तितक्यांत जोगेश्वरीच्या देवळाचा दर्शनी दरवाजा उघडला. बाहेर तिष्ठत उभीं असलेलीं माणसें देवीच्या दर्शनासाठीं देवळांत जाऊं लागलीं, तोंच देवीचा गुरव पुजारी त्यांच्याकडे रडगाणें गाऊं लागला, 'कट्टयावरच्या घुमटींतल्या मारुतीचें शेपूट गेल्या रात्रीं उंदरानें कुरतडून टाकलें ! जर तांतडीनें दुसरी मूर्ति स्थापन केली नाहीं, तर लोक त्या मारुतीला 'लांड्या मारुती' म्हणून ओळखूं लागतील ! या पुण्यांतल्या मारुतींचीं नांवें भांग्या मारुती, जिलब्या मारुती, गवत्या मारुती अशीं विचित्र आहेत. त्यांच्यांत आणखीन् या

'लांडया' मारुतीची भर पडेल! या देवळाच्या आवारांत माझी सारखी भिरभिरती नजर असते; पण हा उंदीर इथें कुठून मरायला येतो कुणास ठाऊक!'

'एके दिवशीं तर त्या दिनू उंदरानें कहरच केला. जोगेश्वरीच्या पुजाऱ्यापाशीं पुष्कळ पायजमे होते, पण पायजम्याच्या आंत घालायचे लंगोट फक्त दोनच होते. त्या दोहोंतला एक तो रोज नेसे नि दुसरा धुवून वाळत घाली. दिनू उंदरानें संधि साधून त्याचा वाळत घातलेला लंगोट लांबविला! पुजाऱ्यानें तो लंगोट शोध, शोध, शोधला; पण त्याला तो सांपडला नाहीं. अखेरीस तो सांपडला दिनूच्या बिळांत नि कुरतडलेल्या अवस्थेंत!

'तो पुजारी हातांत दंडुका घेऊन दिनूच्या बिळापाशीं पहारा करीत बसला! उंदीर बिळाबाहेर आल्यावर त्याचा चेंदामेंदा करायचा असा त्याचा बेत होता, पण त्या दिवशीं दिनू बिळाबाहेर पडलाच नाहीं मुळीं! आपला रोजचा हक्काचा 'प्रसाद' नेण्यासाठींहि तो बिळाबाहेर आला नाहीं!

'जोगेश्वरीच्या देवळासमोरील हॉटेलचा मालक रोजच्या रोज नवे नवे पदार्थ बनवीत असे. त्याचे ते पदार्थ तयार झाल्यावर दिनू उंदीर आपला पहिला भोग भोगीत असे; पण तो तेवढ्यावरच थांबत नसे. ते पदार्थ जिकडे तिकडे उधळून टाकी नि त्या हॉटेलवाल्याचें नुकसान करी. हॉटेलवाला त्याला रोज शिव्याशाप देत असे; पण त्याच्या त्या शिव्याशापांचा दिनूवर कांहींसुद्धां परिणाम होत नसे! त्याला शिव्याशापांची संवयच झाली होती!

'एके दिवशीं असें झालें, दिनू नि राजू हे खेळतां खेळतां

जवळच्या अप्पा बळवंत चौकांतल्या कन्हय्यालाल बिल्डिंगपाशीं जाऊन पोहोंचले. त्या इमारतीच्या प्रवेशद्वारावरचा 'परांजपे लॉजिंग–बोर्डिंग' हा फलक पहातांच आपली त्या इमारतींत रहाण्याचीहि सोय होईल नि खाण्याचीहि सोय होईल असें त्यांना वाटल्यामुळें ते दोन जिने चढून तिसऱ्या मजल्यावर गेले, पण कसचें काय नि कसचें काय! परांजप्यांच्या त्या भोजन-निवासांत नुसती रीघ लागली होती भोजनभाऊंची! पाय ठेवायला जागा नव्हती तिथें!

'अखेर त्या दोघांनींहि आल्या वाटेनें परत जाण्याचा विचार केला नि ते जिना उतरूं लागणार, तोंच त्यांची उजव्या हाताकडच्या एका खोलीकडे नजर गेली. खोलींत एकटीच एक उतार वयाची चष्मा लावलेली बाई ताटांत तांदूळ घेऊन ते निवडीत बसली असल्याचें पाहिल्यावर ते दोघेहि बिचकत बिचकत त्या बाईपाशीं जाऊन पोहोचले. त्यावेळीं त्या बिऱ्हाडांत ती एकटीच बाई होती नि बिऱ्हाडांतली जागाहि ऐसपैस होती.

'त्या दोघां उंदरांना पहातांच ती बाई फारच खूष झाली नि तिनें त्यांना बसावयाला सांगितलें. त्या बाईचें उतार-वय झालें होतें नि त्यामुळें तिची नजरहि कमी झाली होती, म्हणून ती चष्मा लावून ताटांतले तांदूळ निवडीत असली, तरी ते निवडतांना तिला त्रास होत असल्याचें त्या दोघांनाहि दिसून आलें.

'राजूनें तिला विचारलें, 'आजी, तुला मदत करणारें असें दुसरें कुणी नाहीं का या घरांत?'

त्यावर ती बाई म्हणाली, 'मला देवानें फक्त दोनच

मुली दिल्या होत्या; पण त्या लहानाच्या मोठ्या झाल्यावर त्यांचीं लग्नें होऊन त्या दोघीहि आपापल्या घोवाच्या घरीं गेल्या. आतां या घरांत ‘ ते ’ नि मी अशीं दोनच माणसें आहोंत. ते दुकानांत काम करतात नि मी या घरांत वावरत असतें. ’

राजूच्यानें तें पहावलें नाहीं. त्याला त्या बाईची कींव आली. तो तिला म्हणाला, ‘ आण आजी, मी देतों तुझे तांदूळ निवडून. ’

राजूचे ते शब्द ऐकतांच त्या बाईच्या गालावर गुलाब फुलले. तिनें हंसत हंसत तांदळाचें ताट राजूपुढें केलें नि ती त्याला म्हणाली, ‘ घे बाळा, थोडेसेच उरले आहेत निवडायचे, तेवढे निवडून दे म्हणजे झालें. ’

‘ राजू तांदूळ निवडूं लागला, पण रिकामा दिनू तोंडानें वटवट करूं लागला. तो आजीला नाना प्रकारचे प्रश्न विचारूं लागला नि बाईहि त्याच्या प्रश्नांना हंसत हंसत उत्तरें देऊं लागली.

‘ आजी, तुझ्या डोकीवरचे हे केंस पांढरे कसे ग झाले?’ दिनूनें तिला अचानक प्रश्न केला.

‘ उतार वय झालें कीं सगळ्यांचेच केंस असे पांढरे होतात. ’ बाईनें त्याला सांगितलें.

‘ आण, मी तुझे पांढरे केंस कुरतडून टाकतों !’ दिनू तिला म्हणाला.

‘ अरे, सगळेच केंस पांढरे झाले आहेत. ते कुरतडलेस तर माझ्या डोक्यावर अखेर काय रहाणार ?’ ती बाई त्याला समजावून सांगूं लागली.

'पण दिनू हट्टालाच पेटला, तेव्हां त्याचें लक्ष दुसरीकडे वेधविण्यासाठीं त्या बाईनें त्या दोघांनाहि विचारलें, 'तुम्ही दोघेहि कुठें रहातां रे?'

'अग, शेजारच्याच जोगेश्वरीच्या बोळांत रहातों आम्ही.' राजू तांदळांतला अखेरचा खडा फेकतां फेकतां तिला म्हणाला, 'आजी, आम्हीहि तुझ्यासारखेच आहोंत. आमच्या नात्यागोत्याचें दुसरें कुणीच नाहीं.'

'तर मग तुम्ही दोघेहि आजपासून आमच्याकडेच रहा.' ती बाई त्यांना अधिकारवाणीनें म्हणाली. तिला एकाकीपणाचा उबग आला होता नि वेळ घालवायला दुसरें कुणीतरी हवें होतें तिच्या घरांत.

'दिनू बसून बसून कंटाळला होता. त्यानें ताटांतले तांदूळ आपल्या हातानें जरासे घोळविले नि त्या बाईला विचारलें, 'आजी, या तांदळांची तूं खीर करणार कीं काय? हे आंबेमोहोर तांदूळ आहेत म्हणून विचारतों.'

'होय. खाणार तूं?' त्या बाईनें आपलें तोंडाचें दंतहीन बोळकें उघडें करून दिनूला विचारलें.

'हो, हो, कां नाहीं खाणार? खात्रीनें खाईन खीर!' दिनू अशा अधाशी आविर्भावांत बोलला कीं, जणु ती बाई खिरीचें भरलेलें भांडें घेऊन त्याच्या पुढ्यांत उभी होती नि त्याला ती खीर खाण्याचा आग्रह करीत होती.

'ती बाई स्वयंपाकघरांत गेली, तिनें चुलींत विस्तव पेटविला नि चुलीवर खिरीचें भांडें ठेवल्यावर ती पुन्हां बैठकीच्या खोलींत येऊन त्या दोघां उंदरांशीं बोलत बसली.

बऱ्याच दिवसांनंतर तिला बोलत बसण्याची संधि सांपडली होती.

'त्या बाईच्या बोलण्यांत राजू रमला होता, पण दिनूचें लक्ष होतें खिरीकडे ! तीं दोघें बोलण्यांत रमलीं असल्याचें पहातांच दिनू तिथून हळूच निसटला नि स्वयंपाकघरांत गेला. तिथें त्या बाईनें एका भांड्यांत एक चपाती नि थोडी भेंड्यांची भाजी हीं झांकून ठेवलीं होतीं. दिनूनें त्यांचा चट्टामट्टा केला नि तो खीर शिजत ठेवलेल्या चुलीकडे आस्ते आस्ते जाऊं लागला. त्याचें पोट भरलें होतें, त्यामुळें तो आस्तेकदम चालत होता.

'पण दिनूचें दुर्दैव ! तो चुलीपाशीं पोहोंचण्यापूर्वीच त्याला पळत पळत परत मागें यावें लागलें.

'खीर व्यवस्थित शिजली आहे कीं नाहीं तें पहाण्यासाठीं त्या चुलीच्या पुढ्यांत बसलेली बिल्लीबाई खिरीच्या भांड्यावरची वेळणी खालीं उतरून टाकण्याच्या विचारांत होती, इतक्यांत तिथें अचानक आलेल्या पाहुण्याकडे तिची नजर गेली.

'ती त्या पाहुण्याचें स्वागत करण्यासाठीं पुढें सरसावते, तोंच दिनूनें तिथून उडी मारली. तो पुढच्या खोलींत बोलत बसलेल्या बाईपाशीं गेला नि चटकन् तिच्या लुगड्यांत लपून बसला.

'थोड्या वेळानें काळजाची धडधड थांबल्यावर दिनूनें राजूला सारा किस्सा सांगितला नि तो म्हणाला, 'आजपासून मी कधींहि वाऱ्रटपणा करणार नाहीं असें जोगेश्वरीची शपथ घेऊन मी तुला सांगतों. जर मी हावरटपणा केला नसता नि

खीर खाण्याबद्दलची गोष्ट या आजीपाशीं बोललों नसतों, तर इतक्या मोठ्या संकटांत सांपडलों नसतों !'

गोष्ट ऐकतां ऐकतां नीलूला झोंप आल्यामुळें आजीनें आपली गोष्ट थांबविली नि तीहि नीलासोबत कॉटवर झोंपली.

✦ ✦

# सहा

आजी कोणत्या ना कोणत्या कारणानें रोज नीलाच्या घरीं जात असे. माई रोज अंघोळ आटोपल्यावर देवपूजा करीत असे अन् आठवडयांतून मंगळवार नि शुक्रवार या दोन दिवशीं उपोषणें करीत असे. आजीनेंच माईला तसें करायला सांगितलें होतें. आजी रोज सकाळीं नीलाच्या घरीं आल्यावर देवाला अंघोळ घालून त्याची पूजा करी नि त्याला दाखविलेला नैवेद्य प्रसाद म्हणून सर्वांना वांटी.

केव्हां केव्हां ती माईला समजावून सांगे, 'नीला हीसुद्धां तुझीच मुलगी आहे. हिच्यावर आईसारखें प्रेम कर. ही तुझे उपकार जन्मभर विसरणार नाहीं. अन्नदान करणें, व्रतवैकल्यें करणें, गीता वाचणें, या गोष्टी केल्यानेंच पुण्य प्राप्त होतें असें नाहीं; तर एखाद्या अनाथ अन् अश्राप अर्भकाचें लालनपालन करणें हेंसुद्धां पुण्यप्रदच असतें.' असें म्हणून आजी माईच्या खांद्यांवर हात ठेवून तिच्याकडे टक लावून पहात असे; पण

आजीनें तसें केल्यावर आपण काय केलें पाहिजे तें मात्र माईला कळत नसे.

अधूनमधून नीलाला माईनें मारलें नि मार खाऊन झाल्यानंतर नीला तिच्या तावडींतून सुटली, कीं ती तडक आजीच्या घरीं धांवून जात असे. ती तिथें गेल्यावर आजी तिचें रडें तिला लाडीगोडी लावून थांबवी नि तिला तिच्या घरीं नेऊन पोंचवी. त्यावेळीं ती माईला खूप दटावी; पण माई तिला कांहींच उत्तर देत नसे.

आजीच्या घराभोंवतीं फुलबाग होती. तिच्या उपजीविकेचें साधन होतें तें. त्या फुलबागेच्या जोपासनेची जबाबदारी आजीनें एका माळिणीवर सोंपविली होती. ती माळीण सकाळ, संध्याकाळ त्या बागेला पाणी देत असे. हंगामांत मोगऱ्यांचे वेल बरेच बहरत असत. भरपूर फुलें फुलत नि त्यामुळें आजीला पैसाहि बराच मिळे. प्रत्येक फुलझाडाच्या फुलांपानांचा हिशेब नीला ठेवीत असे. कधीं एखाद्या फुलझाडाच्या पानांवर धुरळा सांचलेला दिसला, तर ती तो आपल्या फ्रॉकनें नीट पुसून काढी नि त्या फुलझाडाला विचारी, 'असें घाणेरडें रहातोस का ? आपलें अंग नेहमीं निर्मळ असलें पाहिजे !' अशी ती त्याच्यावर लटकी रागावे नि तेवढ्या वेळांत स्वतःचें दुःख विसरून जाई !

आजीनें पाळलेली मैनाहि नीलाची जिवलग मैत्रीण बनली होती. नीला आजीच्या घरीं गेली, कीं पिंजऱ्यांतली मैना तिला हांक मारूं लागे, 'नीलू नीलू !'

'हं ! मी आलें न आलें तोंच तूं मला सतावूं लागलीस काय ?' नीला त्या मैनेला विचारी.

'नीलू, नीलू !' मैना तिला पुन्हां हांका मारूं लागे !

'सांग, काय सांगतेस मला ?' नीला तिच्या पिंजऱ्या-पाशीं जाई नि तिला म्हणे, 'या पिंजऱ्यांतल्या एकांतांत तुझें मन रमत नाहीं हें मला माहीत आहे ! बरें, मला सांग, आज सकाळपासून तुला खायला काय काय मिळालें ?'

उत्तरादाखल ती मैना पिंजऱ्यांतली वाटी उपडी करून टाकी !

'ठीक आहे. मी समजलें, तुला भूक लागली आहे. थांब, मी तुला खायला घेऊन येतें कांहींतरी.' असें म्हणून नीला आजीच्या खोलींत जाई नि तिथून कांहींतरी आणी.

'घे, खा.' असें म्हणून नीला त्या मैनेला आपल्या हातानें भरवूं लागे.

'ई !' नीला आपला हात मागें ओढी नि मैनेला म्हणे, 'तूं माझें बोट फोडलेंस.' असें म्हणून ती आपल्या बोटाकडे पाहूं लागे.

मैना संकोचून थोडा वेळ गप्प राही नि त्यानंतर नीलाला म्हणे, 'मी जाणूनबुजून नाहीं चावलें तुझें बोट, चुकून चोंच लागली असेल.'

नीला मग हंसे नि मैना तिला पुन्हां 'नीलू, नीलू' अशी हांका मारी !

नीला त्या मैनेपाशीं तासन्‌तास बसून राही ! नीलाला मैनेशिवाय चैन पडत नसे नि त्या मैनेलाहि नीलाशिवाय करमत नसे !

एके दिवशीं आजी वारल्याचें नीलाला समजलें. ती धांवतधांवत आजीच्या घरीं गेली. आजीच्या कॉटेभोंवतीं आजूबाजूच्या घरांतलीं चार पांच माणसें उभीं होतीं. त्यांच्यांत

१६५४६९ ३/८/५९

कांहीं पुरुष होते नि कांहीं बायका होत्या. आजीचें तोंड उघडें होतें नि बाकीचें अंग लोकरीच्या रगानें झांकलें होतें. आजी थंडीनें गारठून मेली असें तिथें जमलेलीं माणसें म्हणत होतीं! नीलाला मात्र ती रोज झोंपत असे, तशीच झोंपली आहे असें वाटत होतें! ती नेहमीं तशीच तोंडावर हात ठेवून झोंपत असे. आजीच्या हातांतल्या सोन्याच्या बांगड्याहि चकाकत होत्या! ती त्या रोज साबणानें घाशीत असे.

नीला आजीच्या प्रेताकडे टक लावून पाहूं लागली; पण तिला कांहींच कळेनासें झालें! तितक्यांत तिचे बाबा तिथें आले अन् त्यांनीं मैनेच्या पिंजऱ्याचें दार उघडून आंतल्या मैनेला मोकळें केलें!

पिंजऱ्यांतून बाहेर पडल्यावर ती मैना आजीच्या कॉटवर जाऊन बसली. बराच वेळपर्यंत ती इकडून तिकडे उडत होती अन् 'आजी! आजी!' अशा हांका मारीत होती!

त्यानंतर ती उडून नीलापाशीं आली नि 'नीलू, नीलू, आजीला काय झालें ग?' असें तिनें नीलाला विचारलें.

नीलानें बाहेरच्या अंगणाकडे बोट दाखवितांच ती तिथून उडाली नि अंगणांतल्या भिंताडावर जाऊन बसली! आजीचें प्रेत स्मशानांत नेईपर्यंत ती तिथेंच बसून होती. प्रेत घरांतून बाहेर काढल्यावर ती तिथून दुसरीकडे कुठेतरी उडून गेली; पण त्यानंतर ती नीलाला कधींच दिसली नाहीं.

नीलाला त्यानंतर बरेंच दिवसपर्यंत आजीची आठवण येई! माणसाशीं जितेपणीं जवळीक जडली नसेल, तर तें माणूस मेल्यावरहि रडूं येत नाहीं! आतां आजी आपल्याला कधीं गोष्टी सांगणार नाहीं, 'नीला हीसुद्धां तुझीच लेक आहे,

त्यासाठीं तिचें मातेच्या मायेनें लालनपालन कर ' असें आपल्या सावत्र आईला सांगायला येणार नाहीं, असे विचार नीलाच्या मनांत आल्यावर तिचे डोळे पाणावत असत नि त्यांच्यांतून अश्रुधारा वहात असत. बहुतेक रिकामपणीं तिला आजीची याद येई नि याद येतांच ती रडूं लागे !

✦ ✦

## सात

खलप डॉक्टरांनीं अनूपला तीन दिवस ट्रीटमेंट दिल्या-वर ते अनूपच्या आईला म्हणाले, ‘अनूपच्या आई, अनूप प्लूरिसीनें आजारी आहे. याला लगेच ससून हॉस्पिटलांत घेऊन चला.’

घरांतलीं सगळीं माणसें चिंताक्रांत झालीं होतीं !

त्याचा चेहरा पिवळा पडला होता नि तो संत्र्याच्या सालीसारखा वाळून गेला होता !

अनूपच्या किंकाळ्या कानीं पडतांच नीलाच्या अंगावर कांटा उभा राही ! अनूपच्या दुःखापेक्षां तिला स्वतःचें सारे कष्ट कमी वाटत असत.

माईचीं आंतडीं तुटत होतीं.

खलप डॉक्टरांनीं माईला सूचना केली, ‘आईच्या सह-वासांत मूल राहिलें, कीं त्या मुलाची अवस्था बिघडते अन् अखेर आईहि संकटांत सांपडते; त्याकरितां अनूपच्या सोबती-

साठीं दुसऱ्या कुणाची तरी योजना करा.'

नीलाच्या बाबांनीं अनूपच्या सोबतीला नीलाला ठेवायचें ठरविलें नि अनूपबरोबर तिला टॅक्सींतून ससून हॉस्पिटलांत नेलें.

नीला सारा दिवस अनूपच्या सोबतीला राही. माई नि नीलाचे बाबा हीं सांजसकाळ त्या दोघांचें जेवण नि इतर कांहीं जिन्नस घेऊन येत नि अनूपच्या प्रकृतीविषयीं विचारपूस केल्यावर थोडया वेळानें निघून जात.

नीलाच्या सहवासांत अनूपचें मन रमत असे. नीलाहि त्याच्या सहवासांत कधीं कंटाळत नसे.

'ताई, एखादी गोष्ट सांग ना!' अनूप तिला गोष्ट सांगण्याचा आग्रह करी नि नीलाहि तिनें आजीकडून ऐक-लेल्या गोष्टीपैकीं एखादी गोष्ट सांगत असे.

'ताई, उत्तानपाद राजाच्या मांडीवर बसलेल्या ध्रुव-बाळाला खालीं खेंचून काढतांना त्याची सावत्र आई त्याला काय म्हणाली तें गाणें दाखव ना म्हणून!'

नीला मग त्याला तें गाणें म्हणून दाखवी—

"पोरा! ये माझ्या उदरीं। मग तूं बैसें मांडीवरी ॥
चल उठ येथुनि जाई दुरी। कैंचें हें सुख तव पदरीं! ॥ध्रु०॥
केलिस पूर्वी क्रिया खोटी। म्हणवुनि जन्म तिच्या पोटीं ॥
आतां तुज राज्यसुखासाठीं। लागली आशा बहु मोठी ॥
कैशा घडतिल या गोष्टी। पाहिजे पुण्य पदरीं कोटी ॥
दुराशा व्यर्थ मनीं न धरीं। कैंचे हें सुख तव पदरीं ॥
पोरा! ये माझ्या उदरीं। मग तूं बैसें मांडीवरी! ॥१॥"

'ताई, त्या होरसच्या सावत्र आईला जेव्हां यमदूतांनीं दोरीनें बांधून अग्निकुंडांत ढकललें, तेव्हां ती फारच रडली असेल नाहीं?'

'होय तर!'

'मग तिला कुणी वांचविलें?'

'कुणीहि नाहीं! पापी माणसांना कुणीहि वांचवीत नसतें!' नीला अनूपला सांगे.

'ताई, पांच वर्षांचा ध्रुव आपलें घरदार सोडून जंगलांत कशाला ग गेला?'

'सावत्र आईनें त्याला छळलें म्हणून.'

'ताई, तपश्चर्या कशाला ग म्हणतात?'

'मन मारण्याला! आपली कोणतीहि आशा आकांक्षा पुरी झाली, तरीहि आपलें मन आवरणें, याला तपश्चर्या म्हणतात.'

'ताई, राक्षस कसलेसे असतात ग?'

'ते तुझ्यामाझ्यासारखेच असतात; पण ते वाईट कामें करतात म्हणून त्यांना राक्षस म्हणतात!'

'प्रत्येक स्त्री–पुरुषाला राक्षस बनतां येतें का?'

'हो! जो स्वतःच्या बुद्धीनें काम करीत नाहीं, आपलें मन ताब्यांत ठेवीत नाहीं, स्वतःच्या स्वार्थाचाच विचार करतो, त्याला–'

'ताई, पाप कशाला म्हणतात?'

'वाईट कृत्याला.'

'मग प्रत्येक वाईट कृत्य हें पाप ठरतें का?'

'होय!'

'ताई, पांखरांच्या पिल्लांना त्रास देऊं नकोस. त्रास दिलास तर तुला पाप लागेल असें एकदां सुनीलनें सांगितलें होतें मला.'


'होय, कुणालाहि निष्कारण त्रास देणें हें पापच आहे.'

'त्या पापाबद्दल प्रायश्चित्त कसें घ्यायचें असतें?'

'तसलें पाप पुन्हां करणार नाहीं असा मनाचा निश्चय करून.'

'मी तसलें वाईट काम करणार नाहीं नि कुणाला सतावणारहि नाहीं, नपेक्षां मलाहि पाप लागेल!' अनूप समंजस बनण्याचा प्रयत्न करूं लागला नि नीलाला म्हणाला, 'ताई, थोडें पाणी दे ग प्यायला!'

'आत्तांच तुला दिलें होतें ना प्यायला पाणी? मग इतक्यांतच तुला तहान लागली?' असें म्हणून नीलानें ग्लासांत पाणी ओतलें नि तो ग्लास त्याच्या हातांत दिला.



अनूप त्यांतलें थोडेंसें पाणी प्याला नि उरलेलें पाणी त्यानें नीलाच्या फ्रॉकवर फेंकलें !

'काय केलेंस हें?' नीलानें घाबरून त्याला विचारलें.

नीला चिडली नि खिडकींत उभी राहून हुतात्मा चौकांतल्या स्मारकस्तंभाकडे पाहूं लागली. अनूपनें तिला हांका मारल्या; पण तिनें ओ दिली नाहीं नि मागें वळूनहि पाहिलें नाहीं. अखेर अनूप कॉटवरून उठण्याचा प्रयत्न करूं लागला, तेव्हां ती धांवत मागें आली नि तिनें 'काय झालें रे?' म्हणून त्याला रागानें विचारलें.

'तूं बोललीस कां नाहीं?' अनूपनें तिला हंसत हंसत विचारलें.

'तूं माझ्या अंगावर पाणी कां उडविलेंस?'

'अच्छा, आतां नाहीं उडवणार!'

'माझें काय? सताव मला! तुलाच पाप लागेल!' नीला त्याच्या कॉटवर बसतां बसतां त्याला म्हणाली.

'पुन्हां पाणी उडवणार नाहीं म्हणून सांगितलें ना? झालें प्रायश्चित्त!'

'आरंभीं मला सताव नि नंतर प्रायश्चित्त घे! गेलें पाप धुवून!'

'अच्छा ताई, आतां थोबाडींत मारून घेतों, म्हणजे तरी झालें ना?' असें म्हणून तो आपल्या थोबाडींत मारून घ्यायला लागला.

'नाहीं.' नीला ओरडली, 'काय करतो आहेस तूं हें? तुझ्या अंगांत ताप चढला, तर माईकडून मला मार खावा लागेल!'

असें म्हणून नीलानें त्याचे दोन्ही हात दाबून धरले नि त्याला कॉटवर स्वस्थ पडायला लावलें. थोड्याच वेळांत अनूपला गाढ झोंप लागली.

◆ ◆

# आठ

अनूपच्या केसांतून हात फिरवितां फिरवितां नीला त्याला बिल्लीबाईची गोष्ट सांगूं लागली –

‘ बिल्लीबाई बऱ्याच दिवसांपासून हैराण होऊन गेली होती. उतार वयामुळें तिची दृष्टी मंदावली होती नि पर्यायानें तिला रोज एकादशीचा उपवास घडत होता. उंदीर तिच्या पुढ्यांतून जात; पण ते तिला दिसत नसत.

‘ डॉक्टर मारुतीराव माकडे आपल्या हॉस्पिटलांत डोळ्यांची तपासणी करून चष्मे मोफत देतात असें बिल्लीबाईच्या भावजयीनें तिला सांगितलें होतें. बिल्लीबाई त्याच दिवशीं हॉस्पिटलांत जाणार होती; पण तिच्या शेजारच्या घोड्याची लहर लागत नव्हती ! अखेर बिल्लीनें बाबापुता केल्यावर तो तिला आपल्या पाठीवरून हॉस्पिटलांत न्यायला तयार झाला. बिल्लीबाई त्याच्या पाठीवर बसली नि हॉस्पिटलांत जाऊन पोहोंचली !

'नमस्ते डॉक्टरसाहेब !' बिल्लीबाईनें अंदाजानें अभिवादन केलें.

'अहो तुम्ही मावशी ? कशा काय वाट चुकलांत ?' डॉक्टर माकडयांनीं तिच्याकडे न्याहाळून पहातां पहातां तिला विचारलें.

'अरे बाळा, माझी दृष्टी मंदावल्यामुळें मला पोटभर जेवण मिळेनासें झालें आहे हल्लीं. तूं मोफत चष्मे वांटतोस असें ऐकलें म्हणून इथें आलें. मला एक चांगल्याशा फ्रेमचा चष्मा दे !' बिल्लीबाई कळवळून म्हणाली.

'ठीक आहे. बसा. मी बाकीचे पेशंटस् तपासतों नि नंतर देतों तुम्हांला चष्मा.' असें म्हणून डॉक्टर माकडे आपल्या कामाला लागले.

'बिल्लीबाईनें त्याला तोंडभर आशीर्वाद दिल्यावर ती तिथल्या बांकावर बसली. थोडया वेळानें तिला डॉक्टर माकडयांनीं सुंदर फ्रेमचा एक चष्मा दिला.

'चष्मा डोळयांना लावल्यावर बिल्लीबाई पायींच घरीं जायला निघाली. चालतां चालतां ती मनांत म्हणाली, अहाहा ! या चष्म्यामुळें मला आतां पूर्ववत् सारें नीट दिसूं लागलें. तो समोरून अस्वलभाई येतो आहे. माझा चष्मा पाहिल्यावर तो चकित होईल !'

'काय मनूताई ? तूंहि आतां चष्मा लावूं लागलीस ?' त्या अस्वलानें बिल्लीबाईला विचारलें.

'होय भाई ! चष्म्याशिवाय काम करतां येत नाहीं. बरें, पण तूं कुठें निघालास ?' बिल्लीबाईनें अस्वलभाईला विचारलें.

'कुठें नाहीं. जंबूकरावांनीं साखरेचें परमिट देतों म्हणून मला सांगितलें होतें, त्याच्या चौकशीसाठीं जातों आहें पुरवठा खात्याच्या कचेरींत.'

'त्यानंतर सध्याच्या सरकारी कारभारांतील भ्रष्टाचारासंबंधीं बोलतांना तो म्हणाला, 'गंगामाईची शपथ घेऊन तुला सांगतों मनुताई, आजच्या जगांत प्रामाणिकपणा नांवालाहि उरलेला नाहीं. तूं शहरांत रहाणारी आहेस, म्हणून तुला सारें माहीत असेलच!'

'बिल्लीबाई म्हणाली, 'तूं म्हणतोस तें खरें आहे.'

'त्या लुच्च्या कोल्हयानें मला चार किलो साखरेचें परमिट देण्याचें कबूल केलें; पण त्यासाठीं त्यानें माझ्याकडून आगाऊ पांच रुपयांची लांच घेतली. अर्जावर जर योग्य तेवढें वजन ठेवलें नाहीं, तर तो अर्ज वाऱ्यानें कुठल्या कुठें उडून जातो असें तो मला म्हणाला!' असें म्हणून अस्वलभाई पुढें चालूं लागला नि नंतर बिल्लीबाईहि आपल्या मार्गाला लागली.

'काय मावशे, तूं आतां चष्मा लावायला लागलीस?' समोरून येणाऱ्या रानबोक्यानें चष्म्याकडे निरखून पहात बिल्लीबाईला विचारलें.

'होय बाबा, त्याच्याशिवाय भागत नाहीं.' बिल्लीबाई म्हणाली.

'रानबोका थट्टेखोर होता. तो तिला म्हणाला, 'पाकिस्ताननें आमच्या भारतावर आक्रमण केल्याचें ऐकतों.'

'होय, ही बातमी मी काल रात्रींच रेडिओवर ऐकली.'

'चल मावशे, मी तुझी सैन्यांत भरती करवितों. चष्म्यामुळें तूं तरणीबांड दिसतेस!' रानबोक्यानें बिल्लीबाईची थोडीशी थट्टा केली.

'चल हट ! माझ्यासारख्या म्हातारीची थट्टा करतांना तुला लाज वाटत नाहीं ?' बिल्लीबाई गुरगुरली.

'नाहीं मावशे, खरें तेंच बोलतों आहें मी !' असें म्हणून त्या रानबोक्यानें बंदुकीचा नेम धरण्याचा अभिनय केला अन् तो बिल्लीबाईला म्हणाला, 'मग तूं दंबूकीनें असे उंदीर मार ! तुला मग उंदीर पकडण्यासाठीं धांवपळ करावी लागणार नाहीं मावशे !'

'कशानें उंदीर मारूं म्हणालास ?' बिल्लीबाईनें विचारलें.


'दंबूकीनें, दंबूकीनें !' रानबोका म्हणाला.

'अरे मूर्खा, तिला बंदूक म्हणतात, दंबूक नाहीं म्हणत!'

'शहरांतलीं सुधारक माणसें म्हणत असतील बंदूक; पण मागासलेलीं जंगली जनावरें तिला दंबूकच म्हणतात !'

'बरें, आतां तूं इथून जाणार कीं माझ्याकडून मार खाणार ?' असें बिल्लीबाईनें रानबोक्याला विचारलें नि ती पुढें चालूं लागली.

'कसें काय गद्धेभाई ? खांद्यावर न पिचणारी बांबूची लाठी घेऊन कुठें निघालास ? कुठें मारामारीसाठीं चाललास कीं काय ? येत्या मंदवासरीं, मारुतीजन्मदिनीं, मारुती मोटार निर्मात्या संजय गांधींची मातुश्री आमच्या या पुण्यांत येणार असून तिच्या गाडीपुढें आडवे पडणाऱ्या निदर्शकांच्या 'बंदोबस्ता'साठीं तुझ्यासारख्या भाडोत्री ओझ्याच्या गाढवांना राज्यांतील पुढाऱ्यांनीं आवर्जून आमंत्रणें दिलीं असल्याचें ऐकतें ! खरें खोटें देव जाणे ! अन् लाठीच्या टोंकाला या इतक्या पिशव्या कशासाठीं अडकविल्या आहेस !' बिल्लीबाईनें समोरून येणाऱ्या गाढवाला विचारलें.



'कसची मारामारी नि कसचा बंदोबस्त मावशे? मी माझ्या पोटाचा बंदोबस्त करण्यासाठीं सरकारी स्वस्त धान्याच्या दुकानांतून रेशन आणायला जात आहें अन् या पिशव्यांबद्दल सांगायचें म्हणजे 'खाणें थोडें नि मचमच फार' या जुन्या वाक्प्रचाराऐवजीं आतां 'रेशन थोडें नि पिशव्या फार!' असा वाक्प्रचार चालू करण्याची वेळ आमच्यावर आली आहे! रेशनमध्यें मिळणाऱ्या पांचशें ग्रॅम साखरेसाठीं एक पिशवी, मूठभर चण्याच्या डाळीसाठीं एक पिशवी, पाव किलो सडक्या तांदळांसाठीं एक पिशवी, अर्धा किलो कुजक्या गव्हांसाठीं एक पिशवी अन् एक किलो अरगटमिश्रित बाजरी-साठीं एक पिशवी, अशा एकूण पांच पिशव्या मीं बरोबर घेतल्या आहेत!' गर्दभराजांनीं खुलासा केला.

'अरे, आजकाल रस्त्यावर मारामारी करण्याच्या कामा-पेक्षांहि रस्त्यावर उन्हातान्हांत उभें राहून रेशन मिळविणें हें काम कठीण आहे!'

'पण मावशे, तुला आतां रांगेंत उभें रहायला नको. तुझ्यासाठीं गलेलठ्ठ दोन उंदीर रेशनमधून देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे असें ऐकतों! तसें झालें तर मग मावशीची मज्जाच मजा!'

'उंदराचें नांव ऐकतांच बिल्लीबाईच्या तोंडाला पाणी सुटलें. ती त्याला पुढें कांहीतरी विचारणार होती, पण तो गाढव तरातरा पुढें निघून गेला अन् बिल्लीबाईहि आपल्या घरीं जाण्यासाठीं निघाली. चालतां चालतां ती मनांत विचार करूं लागली, 'घराच्या खोलींत माजलेले उंदीर इकडून तिकडे नाचत बागडत असतात. मी घरीं जातांच त्यांतला एखादा-दुसरा उंदीर गट्टम करणार!'

'पण बोलाफुलाला गांठ पडल्यासारखा एक भलामोठा उंदीर तिला तितक्यांतच समोरून जातांना दिसला. समोर भला मोठा खड्डा होता. तो पार पाडण्यासाठीं बिल्लीबाईनें जोरांत उडी मारली; पण तिच्या दुर्दैवानें तिच्या डोळ्यांवरचा चष्मा खालीं पडला. तो जमिनीवर पडला कीं त्या खोल खड्ड्यांत पडला तें तिला कळलें नाहीं. ती इकडे तिकडे धुंडाळूं लागली. ती संधि साधून उंदीर तिथून पळाला नि बिळांत जाऊन लपला. बिल्लीबाईनें बराच शोध केला, पण तो चष्मा तिला सांपडला नाहीं!

'कुणीतरी येईल नि आपला चष्मा शोधून देईल अशा आशेनें ती बिल्लीबाई येत्याजात्यांची वाट पहात तिथेंच वसून राहिली!'

○ ○ ○ ○

'हें काय?' नीलानें अनूपला विचारलें.

'तुझ्यासाठीं लपवून ठेवली होती.' असें म्हणून अनूपनें आपल्या अंगावरच्या चादरींत लपवून ठेवलेली सफरचंदाची एक फांक काढली अन् ती नीलाच्या पुढें केली.

'तूंच खा. तुझी प्रकृति बिघडली आहे.' असें म्हणून नीला अनूपच्या शेजारीं बसून त्याचें ठणकणारें डोकें दाबूं लागली.

'मी खाल्लें सफरचंद.'

'नाही, आणखीन् खा.' नीला अनूपनें पुढें केलेला हात मागें सारीत त्याला म्हणाली.

'फक्त एकच फांक!' असें म्हणून अनूपनें आपल्या हातातली सफरचंदाची फांक नीलाच्या तोंडांत सारली, पण नीला कांहीं बोलली नाहीं.

'ताई, आणखीन् एक फांक खा.'

'नको.'

'मी बोलणार नाहीं तुझ्याशीं. ताई घाणेरडी, ताई घाणेरडी! आमची ताई घाणेरडी आहे असें मी सर्वांना सांगणार.'

नीला कांहीं न बोलतां त्याच्याकडे टक लावून पाहूं लागली.

'आई, खोटें बोललें तर पाप लागतें, एखाद्याला विनाकारण त्रास दिला तर यमदूत त्या त्रास देणाऱ्याला दोरीनें बांधतात नि खूप पिटतात. आगीत तापलेल्या सळया त्याच्या अंगांत खुपसतात! असें ताईनें मला सांगितलें आहे' अनूपनें आपल्या आईला सांगितलें.

'नीला!' माई नीलाच्या अंगावर ओरडली नि तिनें तिला विचारलें, 'कसल्या गोष्टी सांगितल्यास त्याला? तुला कुणी सांगितल्या त्या?'

'आजी सांगत असे मला!' नीलानें अपराध्यासारखें उत्तर दिलें.

'आई, आई, ध्रुवाची गोष्ट आमच्या चौथीच्या पुस्तकांत आहे त्याची सावत्र आई त्याला सारखी सतावीत असे नि त्याचा अपमान करीत असे!' अनूपनें आपल्या आईला सांगितलें.

'बडबड बंद कर!' माई अनूपच्या अंगावर ओरडली!

अनूप रडूं लागला नि रडतां रडतां म्हणाला, 'आमची आई घाणेरडी! आमची आई पापीण आहे, आमच्या आईला खूप पाप लागणार! तिला मग यमदूत दोऱ्यांनीं बांधणार नि तापलेल्या सळयांनीं डाग देणार! आईनें आमच्या ताईला निष्कारण छळलें आहे नि अजूनहि छळीत आहे...'

'अनूप...' असें म्हणून माईनें त्याच्या थोबाडावर मोठ्यानें दोन चापट्या मारल्या.

अनूप विव्हळून रडूं लागला. माईहि त्याला बिलगून रडूं लागली.

रडतां रडतां अनूप गाढ झोपीं गेला.

त्याला झोंप लागल्याचें पाहिल्यावर नीलाहि निघून गेली तिथून.

✦ ✦

# नऊ

अनूप हॉस्पिटलांत येण्यापूर्वी घरीं घडलेला एक प्रसंग नीलाला आठवला

'ग ताई, चष्मा मोडला ?' अनूपनें मोडक्या चष्म्याची फ्रेम हातांत घेऊन नीलाला विचारलें.

नीला त्या मोडक्या चष्म्याकडे निरखून पाहूं लागली. तिच्या तोंडांतून शब्द फुटेनासा झाला ! ती आपले पाणावलेले डोळे पुन्हां पुन्हां पुसूं लागली.

'आतां ? आतां आई करवादणार !' अनूपनें तिच्याकडे प्रश्नार्थक नजरेनें पाहिलें; पण नीला ओक्साबोक्शी रडूं लागली.

'घ्या ! तूंहि घाबरलीस ? आमचे आजोबा सांगत होते तेंच खरें आहे. बायका या उंदरासारख्या भित्र्या असतात. मॅंव असा शब्द उंदरानें ऐकल्यावर तो जसा घाबरून बिळांत लपून बसतो, तशाच बायका असतात, असें आजोबा सांगत.' अनूप नाटकी अभिनय करीत म्हणाला, 'अरे, संकटसमयीं

घाबरायचें नसतें, तर संकटांतून कसें सुटतां येईल याबद्दल विचार करायचा असतो. संकटांतून सुटायचें असेल, तर आपण आपली बुद्धि लढवली पाहिजे.'

'तर मग तूंच सांग काय करायचें तें! तूं मोठा युक्तिबाज आहेस!' चहाचा कप फुटला होता, तेव्हां अनूपनें कोणती युक्ति लढविली होती तें नीलाला आठवल्यामुळें तिनें अनूपला तसें सांगितलें. चहाचा कप फुटला हें माईला कळलेंसुद्धां नव्हतें. आतांहि तो तशीच कांहींतरी करामत करील अशी तिला आशा वाटल्यामुळें ती त्याच्या अंगाशीं बिलगली. अनूपनें तिच्या डोळ्यांतलीं आसवें आपल्या सदऱ्याच्या बाहीनें पुसून टाकलीं.

'ताई, तूं जा नि आपल्या कामाला लाग. मी पहातों पुढें काय करायचें तें.' अनूपनें नीलाला हुकूम फर्माविला.

'जा, जा, जा म्हणून सांगतों ना?' अनूप तिला दम देऊं लागला.

नीला खोलीबाहेर निघून गेली.

'अरेरे, माझा चष्मा?' आंघोळ आटोपल्यावर रामायण वाचण्यासाठीं माई आली; पण तिचा चष्मा जागेवर न सांपडल्यामुळें ती जवळजवळ किंचाळलीच, 'मी मेलें रे आतां.'

'चष्मा? आई?' अनूप धांवत तिच्यापाशीं जाऊन पोहोंचला.

'होय बाळा, कुठें दिसतो का पहा जरा.'

'इथें तर कुठेंच दिसत नाहीं' अनूप थोडा वेळ थांबून तिला म्हणाला, 'दुसरीकडे कुठेंतरी ठेवल्याचें तुला आठवतें का बघ.'

'तूंहि पहा, मला कांहीं आठरत नाहीं.' माई अगतिक झाल्यासारखी आर्जवी आवाजांत बोलली.

'आई, तुझा चष्मा उंदरांनीं तर नेला नसेल ना? त्यांना रामायण वाचायचें असेल कदाचित!' अनूप जमिनीवर फतकल मारतां मारतां आपल्या आईला म्हणाला.

'अरे, सकाळच्या रामप्रहरीं वटवट करूं लागलास! शोध जा जरा. जातो कुठें चष्मा?' माई अनूपवर चिडली.

'आई, हल्लीं उंदीरहि माणसांसारखे बुद्धिमान बनले आहेत असें बाबा परवां म्हणाले होते. कदाचित वर्तमानपत्र वाचण्यासाठीं त्यांना तुझ्या चष्म्याची गरज लागली असेल नि त्यांनीं तो उचलून नेला असेल.' असें म्हणून अनूप खदखदां हंसूं लागला.



माई त्यावर कांहींच बोलली नाहीं.

'आई, हा घे तुझा चष्मा! मी सांगितलें होतें ना तुला? उंदरांच्या बिळापाशीं सांपडला! अच्छा, पण मला सांग,

हा चष्मा अगोदर उंदरानें आपल्या डोळ्यांना लावला होता कीं उंदरिणीनें ?' अनूप हंसूं लागला.

माईहि हंसली नि त्याला म्हणाली, 'हा उंदरानेंहि आपल्या डोळ्यांना लावला नव्हता नि उंदरिणीनेंहि लावला नव्हता. तो उंदरिणीच्या पिल्लानें आपल्या डोळ्यांना लावला होता.'

'अरे, पण याच्या एका डोळ्याची कांच कुठें गेली ?' चष्म्यावरची धूळ झाडतां झाडतां माई चपापून म्हणाली, 'मेल्यांनीं कांचहि काढून घेतली !'

'बघूं, बघूं !' अनूप पुन्हां माईपाशीं धांवत गेला. त्यानें माईकडचा चष्मा आपल्या हातीं घेतला नि त्याच्याकडे नाटकी ढंगानें पहात तो म्हणाला, 'अरे होय ! एका डोळ्याची कांच काढून घेतली. किती सफाईनें कांच काढली चोरांनीं.'

'आतां ?' कांहीं वेळानें अनूपनें आपल्या आईला विचारलें.

त्यावर माई म्हणाली, 'आतां काय ? ? आतां अप्पा बळवंत चौकांतलें त्या परांजप्यांचें दुकान उघडल्यावर त्यांच्या-कडून तो दुरुस्त करून घ्यायचा.'

'आई, तूं उंदरांना मारण्याचें औषध आण ना !' अनूपनें सल्ला दिली.

'हट्, पापाची गोष्ट बोललास !' माईनें त्याला झिडकारिलें.

'कां ? आपल्या शत्रूचा नाश करणें हें पाप ठरतें का ?'

'होय बाळा, जीवजंतूंची हत्या करणें हें पापच ठरतें.' माईनें त्याला समजावून सांगितल्यावर ती रामायण वाचतां न आल्यामुळें रामाचें भजन करूं लागली—

'रामा रामा रामा रामा रघुनंदना ।
रामा रामा रामा रामा कुळभूषणा ।।
रामा रामा रामा रामा जानकीपते ।
रामा रामा रामा रामा विमलपते ।।
तोडीं तोडीं तोडीं तोडीं भवपाश ।
आनंदे शरण रामी रामदास ।।'

माई भजनांत रंगून गेली असल्याचें पाहिल्यावर नीला अनूपपाशीं आली नि माईला ऐकूं न जाईल इतक्या हलक्या आवाजांत तिनें अनूपला विचारलें, 'तूं काय केलेंस ?'

'आईला कळूंहि न देतां मीं तो चष्मा प्रथम उंदराच्या बिळापाशीं नेऊन ठेवला नि नंतर तिथून आणून आईच्या हातीं दिला. बरे, पण तूं प्रभात थिएटरांत पिक्चर पहायला येणार ना ?' अनूपनें नीलाला विचारलें.

'होय; पण तूं माईला विचारलेंस का ?' नीलानें अधीर होऊन अनूपला प्रतिप्रश्न केला.

अनूपनें त्यावर लगेच उत्तर दिलें नाहीं तिला.

'आई, मी पिक्चर पहायला येणार नाहीं.' अनूपनें सांगितलें.

'कां ? तूं पिक्चर पहाण्याचा हट्ट घेतला होतास.' माई म्हणाली.

'ताईला तूं कां नाहीं बरोबर नेत ?' अनूपनें आईला विचारलें.

'ती आतां मोठी झाली !' माईनें सांगितलें.

'मग तूं तर तिच्यापेक्षां मोठी आहेस. असें असतां तूं कां जातेस ?'

माई निरुत्तर झाली !

'यायचें असेल तर ये, नपेक्षां कपडे उतर अंगांतले ! मोठा कायदेबाज झाला आहेस !' थोड्या वेळानें माई अनूपला म्हणाली.

अनूप कांहीं न बोलतां अंगावरचे कपडे उतरूं लागला, तेव्हां नीलाला बरोबर नेणें माईला भाग पडलें !

'मी ताईबरोबर जेवणार.' नंतर अनूपनें एकेका तक्रारीला सुरुवात केली.

'तुला नीट न्हाणवतां येत नाहीं, ताई न्हाणवील मला.'

'जसा माझा नि बाबांचा बर्थ-डे थाटांत साजरा करतेस, तसाच या खेपेला ताईचाहि बर्थ-डे साजरा कर!' अनपच्या अंगांत हुकूमशहा संचारला.

'ताईला कां मारलेंस ? माझ्या ताईला कां मारलें ?— मी आतां तुझ्या हातचें जेवणार नाहीं ! मारून टाक एकदां ताईला.' अनूप चिडला आपल्या आईवर.

नीलाचे डोळे पाणावले. तिनें त्याच्या हातांतला ग्लास घेतला नि तो कॉटखालीं ठेवला.

'रडते आहेस ताई ?' अनूपनें घाबरून नीलानें विचारलें.

'नाहीं रे, झोंपून उठलें आहें मी ! नीलानें उडवा-उडवीचें उत्तर दिलें,

'झोंपून तर मीहि उठलों आहें !' अनूप म्हणाला.

'मला स्वप्न पडलें होतें !' नीलानें अनूपला खोटेंच सांगितलें.

'कसलें ? आईनें तुझें शिक्षण बंद करून तुला भांडीं घांसायला लावलें असें ?' अनूप प्रथम हंसला नि नंतर गंभीर स्वरांत तिला म्हणाला, 'ताई, तूं रडूं नकोस ! तुझी मला काळजी आहे. माझ्यावर विश्वास ठेव पुरता !'

—अन् नीलाच्या डोळ्यांतील अश्रूंचा बांध फुटल्यानें ते बाहेर पडले !

✦ ✦

# दहा

'बाळ अनूप ?' दरवाजांतून आंत शिरतां शिरतां माईनें अनूपला हांक मारली.

'आई !' अनूप कॉटवर उठून बसला.

'कशी आहे तुझी तब्येत ?' कॉटच्या कडेवर बसतां बसतां माईनें अनूपला विचारलें.

'अनूप जिता आहे कीं मेला तें पहाण्यासाठीं आत्तां आलीस होय ?' अनूपनें तिला रागांत विचारलें.

'हत् ! काय अभद्र बोलतोस !' माईचे डोळे पाणावले.

'सकाळपासून कुठें गडप झाली होतीस ?' अनूपनें त्याच स्वरांत प्रश्न केला.


'बाळा, तुझ्या बाबांना कचेरींत लवकर जायचें असतें ना ? त्यांच्यासाठीं स्वयंपाक तयार करावा लागला, तुझ्या पथ्यापाण्याचें पहावें लागलें. शिवाय अंघोळ करायची होती, धुणीं धुवायचीं होतीं, देवपूजा करायची होती...'

'हं, या तुझ्या सदांच्याच सबबी आहेत. इथें दिवसभर बिचारी ताई असते म्हणून, नपेक्षां हैराण होऊन गेलों असतों मी.'

माईची नजर नीलाकडे गेली. नीला एका कोपऱ्यांत निमूट उभी होती. माईच्या नजरेला नजर भिडतांच ती संकोचली. तिचें काळीज धडधडूं लागलें.

'संत्रें खाणार ?' माईनें अनूपला विचारलें.

'नको, मला खायचें नाहीं तुझें तें संत्रें.'



'अरे घे, अस्सल नागपुरी आहे हें, फारच गोड आहे.' असें म्हणून माईनें तें संत्रें सोललें. त्याची एक बोय अनूपच्या तोंडांत घातली नि दुसरी बोय आपल्या तोंडांत घातली.

'अन् ताईला ?' आपल्या तोंडांतली बोय तोंडांतल्या तोंडांत घोळवतां घोळवतां अनूपनें माईला विचारलें.

माईनें तिसरी बोय काढून ती नीलाला दिली.

'आई, इथले डॉक्टरसाहेब माझ्या दंडांत सुया टोंचण्याचें कधीं बंद करणार ?' अनूप आपल्या दंडावर हात ठेवून कण्हत म्हणाला.

माई त्याच्या दंडावरून अलगद हात फिरवूं लागली नि थोडचा वेळानें त्याला म्हणाली, 'बस्! आतां तूं लौकर बरा होणार. आतां सुया टोंचाव्या लागणार नाहींत तुझ्या दंडांत.'

'आई, माझें रोपटें चांगलें आहे ना ? तें वाळून नाहीं ना गेलें ?' अनूपनें आपल्या शाळेच्या रखवालदाराकडून चमेलीचें रोपटें मागून आणलें होतें नि तें कुंडींत रोवलें होतें, त्याची त्याला आठवण झाल्यामुळें त्यानें आपल्या आईला तसें विचारलें.

'मला माझ्या रोपटचाची काळजी आहे.' माई नाटकी आविर्भावांत हंसतां हंसतां म्हणाली.

'तुझें रोपटें ?' अनूप चपापला.

'होय, माझेंहि एक रोपटें आहे. अगदीं लहानसें, नाजुकसें आहे. पूर्वीं तें फारच बोलकें होतें; पण आजकाल तें अबोल कां बनलें आहे, कांहीं कळत नाहीं मला.'

असें म्हणून माई भिंतीकडे पाहूं लागली.

अनूप लाजला नि हंसूं लागला.

'आई, काल रात्रीं मला एक स्वप्न पडलें.' अनूप आपल्या आईला म्हणाला.

'मलाहि पडलें एक स्वप्न.' असें म्हणून माई हंसूं लागली.

'कसलें ?' अनूपनें विचारलें.

'तुला कसलें पडलें तें सांग अगोदर.' माई अनूपला म्हणाली.

'नाहीं, तुला कसलें पडलें तें सांग आधीं.' अनूप हट्टाला पेटला.

'माझा अनूप आतां साफ बरा झाला. तो आपल्या अंगांत नवे कपडे घालून शाळेंत जाण्याच्या तयारीनें उभा असल्याचें मीं स्वप्नांत पाहिलें.' माई म्हणाली.

'पुढें काय झालें?' माई उगी राहिल्याचें पाहिल्यावर अनूपनें तिला विचारलें.

'एके दिवशीं अनूप जेव्हां बराच मोठा वाढला, तेव्हां त्याच्यासाठीं मीं एक सुंदर नवरी शोधून काढली!' माईनें पुस्ती जोडली.

'हट्, तुझें स्वप्न खरें नव्हे.' असें म्हणून अनूप आपल्याला पडलेलें स्वप्न तिला सांगूं लागला–

'एक सुंदर–सर्वांत सुंदर–परी माझ्यापाशीं आली नि ती मला म्हणाली, 'चल, मी तुला आपच्या परीलोकांत हिंडवून आणतें'

त्यानंतर अनूप थांबला नि पुढें काय सांगावें त्याबद्दल मनांत विचार करूं लागला.

'पुढें काय झालें?' माईनें विचारलें.

'त्या सोनपरीनें मला साऱ्या परीलोकांत हिंडविलें. तिथें बऱ्याचशा सुंदर सुंदर परी होत्या!'

'तूं त्यांतल्या एखाद्या परीची निवड करून तिला बरोबर नाहीं आणलेंस?' माईनें मध्येंच विचारलें.

ऐकून तरी घे नीट.' असें म्हणून अनूप पुढें सांगूं लागला,

'त्या परीनें मला बरीचशी मिठाई खायला दिली. चॉकलेटस्हि भरपूर दिलीं खायला !'

'तूं माझ्यासाठीं कांहींच नाहीं आणलेंस ?' माईनें विचारलें.

'अग, तें सत्य नव्हतें, स्वप्न होतें.' अनूपनें तिला समजाविलें.

'ठीक आहे.' माई संतुष्ट होऊन त्याच्याकडे पाहूं लागली.

'नीलाताईहि होती माझ्यासोबत.' अनूपनें तिला पुढें सांगितलें.

'हत् तुझी, प्रत्येक वेळीं तुझें एकच सांगणें नीलाताई, नीलाताई ! अरे, ती नीलाताई नसून चालती बोलती वावटळ आहे वावटळ !' माई म्हणाली.

'मी नाहीं जा बोलत तुझ्याशीं.' असें म्हणून अनूपनें आपलें तोंड फिरविलें.

माईनें त्याला कुशींत ओढलें नि म्हणाली, 'अरे, मी तसें थट्टेनें म्हटलें. तुझी ताई फारच चांगली आहे. ती तुझ्याशीं गोड गोड बोलते, तुला चांगल्या चांगल्या गोष्टी सांगते,...' माई त्याच्या पाठीवरून हात फिरवूं लागली.

'तर मग मघां तूं नाराज कां झालीस ?' अनूपनें आईला विचारलें.

'मी तसें उगीच बोललें होतें.' माईनें सारवासारव केली.

कोपऱ्यांत उभ्या असलेल्या नीलाला माईच्या बोलण्याविषयीं विश्वास वाटेनासा झाला. आतां जी बोलली, ती माई नसून स्वर्गांतून खालीं आलेली आपली आईच आहे असें तिला वाटलें !

# अकरा

IRBK-0116559
IRBK-0116559

'हॅल्लो, डॉक्टर अनूप! कशी काय आहे आपली प्रकृती?' ससून हॉस्पिटलच्या डॉक्टरांनीं अनूपच्या कॉटकडे येतां येतां हंसत हंसत त्याला विचारलें.

'चांगली ठणठणीत आहे अंकल.' अनूपनें उत्साहि स्वरांत त्यांना सांगितलें; पण त्याच वेळीं त्याला कांपरें भरलें! कारण, गोड गोड गोष्टी सांगत असतांनाच ते डॉक्टर रोज त्याच्या दंडांत सुई खुपशीत असत, याची जाणीव त्याला त्यावेळीं झाली होती.

डॉक्टरांनीं स्टेथास्कोपच्याद्वारें त्याला तपासल्यावर ते त्याला म्हणाले, 'बस्! आतां मी तुला लौकरच घरीं पाठवीन हं!'

'कधीं पाठवाल? अनूपनें त्यांना मोठ्या आतुरतेनें विचारलें.

'कां? इथ तुला कंटाळा येतो कीं काय?' असें म्हणून डॉक्टर हंसूं लागले.

'मग काय आनंद होतो? सारा दिवस आरडाओरड चालूं असते. कुणी रडत असतात, कुणी ओरडत असतात! हॉस्पिटल हें विश्रामधाम थोडेंच असतें?' अनूप म्हणाला.

त्यावर डॉक्टरांनीं मनांत हिशेब केला नि ते अनूपला म्हणाले, 'येत्या शनिवारीं मारुती जयंतीदिवशीं भारताच्या पंतप्रधान इंदिराजी गांधी या पुणें विद्यापीठाच्या रजत महोत्सवासाठीं येणार आहेत. तुला त्यांच्या स्वागतासाठीं जायचें असेल? जा बापडा. तेव्हां आज बुधवार तीन तारीख, उद्यां चार तारखेला महावीर जयंति. बस्. परवां पांच तारखेला शुक्रवारीं संध्याकाळीं मी तुझी इथून सुटका करतों.' अन् त्यानंतर ते उठतां उठतां त्याला म्हणाले, 'अन् आजपासून तुझ्या इंजेक्शनालाहि सुट्टी!'

'अन् कहाण्यांना बुट्टी?' असें म्हणून अनूप आपल्या कॉटवर उठून बसला नि हंसूं लागला.

'छे, छे, कहाण्यांना कधींहि बुट्टी नाहीं मिळायची!'

असें म्हणून डॉक्टर कॉटपाशीं असलेल्या खुर्चीवर बसले नि अनूपला गोष्ट सांगूं लागले–

'राजा बहादुरसिंहाचे अत्याचार दिवसेंदिवस वाढत चालले होते. त्याला आपल्यासारखा पराक्रमी राजा दुसरा कुणीच नाहीं असें वाटत होतें.

'बिचाऱ्या राजा ज्ञानसिंहाचें राज्य बहादुरसिंहाच्या राज्यापेक्षां लहान होतें. अर्थात त्याच्यापाशीं सैनिकहि जास्त नव्हते, म्हणून त्याला बहादुरसिंहाशीं लढाई करतां येणेंहि शक्य नव्हतें!

'राजा बहादुरसिंह दर खेपेला ज्ञानसिंहाकडे दुर्मिळ

नि महाग अशा वस्तूंची मागणी करीत असे अन् त्याची ती मागणी पुरी करतां करतां राजा ज्ञानसिंह हैराण होत असे! सारांश, बहादुरसिंहानें ज्ञानसिंहाचें सारें सुख हिरावून घेतलें होतें.

'ज्ञानसिंहाच्या राज्यांत एक निष्णात वैद्य होता. राजा त्या वैद्याला फार मान देत असे. एक दिवशीं ज्ञानसिंहानें त्या वैद्याला आपल्या राजवाड्यांत बोलावून आणलें नि आपली दर्दभरी कर्मकथा त्याला सांगितली.

'राजानें सांगितलेली कर्मकथा ऐकून घेतल्यावर त्या वैद्यानें राजाच्या कानांत कांहींतरी सांगितलें. बहुतेक कोणता तरी उपाय सुचविला असेल!

'वैद्यानें सुचविलेला उपाय राजाला पटला. तो वैद्याला म्हणाला, 'वैद्यबुवा, पटला तुमचा उपाय! मी तो उद्यांच अमलांत आणतों.'

'ज्ञानसिंह लगेच बहादुरसिंहाच्या दरबारांत गेला नि हात जोडून नम्र स्वरांत बहादुरसिंहाला म्हणाला, 'महाराजाधिराज, उद्यां माझ्या एकुलत्या एका मुलाचा वाढदिवस आहे. आपण आपल्या साऱ्या सैनिकांसह उद्यां दुपारीं भोजनास येण्याची कृपा करा!'

'बहादुरसिंहानें ज्ञानसिंहाच्या निमंत्रणाचा स्वीकार केला.

'दुसऱ्या दिवशीं दुपारीं बहादुरसिंह आपल्या साऱ्या सैनिकांसमवेत भोजनासाठीं ज्ञानसिंहाच्या राजवाड्यांत गेला. त्याच्याबरोबर त्याचे सगळे सैनिकहि गेले.

'बहादुरसिंहासह त्याचे सारे सैनिक जेवायला बसले

नि ज्ञानसिंहाच्या वाढप्यांनीं त्यांना आग्रहानें जेवण वाढलें. मासळीबाजारांत जशी आरडाओरड चालू असते, तशी ज्ञानसिंहाच्या राजवाड्यांत 'आणखीन वाढा! आणखीन वाढा!' अशी सैनिकांची आरडाओरड बराच वेळ चालू होती.

'जेवण फारच स्वादिष्ट असेल!' अनूप मध्येंच म्हणाला.

'फारच स्वादिष्ट होतें!' असें म्हणून डॉक्टर पुढें सांगू लागले, 'जेवण आटोपल्यावर ते सैनिक वामकुक्षीसाठीं जरा लवंडणार होते; पण कसचें काय! सारे सैनिक गडबडून गेले! 'मी अगोदर बर्हिर्दिशेला जाणार!' 'मी जाऊन येतों अगोदर दीर्घशंकेला!' सारे सैनिक जुलाबांनीं हैराण होऊन गेले. एकदां बर्हिर्दिशेला जाऊन आल्यावर हातपाय धुतात न धुतात, तोंच पुन्हां बर्हिर्दिशेला जाण्याची तयारी! अशा रीतीनें त्या सैनिकांचे भयंकरच हाल झाले!'

'डॉक्टर अंकल, अरगटमिश्रित बाजरीच्या भाकरी खाल्ल्यामुळें जुलाबांनीं हैराण झालेले बरेचसे लोक हल्लीं या हॉस्पिटलांत येत असतात. ज्ञानसिंहानें त्या सैनिकांना अरगटमिश्रित बाजरीच्या भाकरी खाऊं घातल्या होत्या कीं काय?' अनूपनें आपली लघुशंका प्रकट केली.

त्यावर डॉक्टर म्हणाले, 'छे रे! सोनामुखी नांवाची एक वनस्पती आहे, तिचा पाला भाज्यांत मिसळला होता नि त्यामुळें त्या सैनिकांना लगेच जुलाब होऊं लागले. ज्ञानसिंहाच्या वैद्यानें ज्ञानसिंहाच्या कानांत तसेंच करायला सांगितलें होतें नि ज्ञानसिंहानें ती युक्ति अमलांत आणली होती!

'आपल्या सैनिकांचे होत असलेले हाल पाहिल्यावर

बहादुरसिंह चिडला नि ओरडला, 'कुठें आहे तो भोसडीचा ज्ञानसिंह ! त्या मादरचोदाला माझ्यासमोर आणा बोलावून ! मी आत्तांच त्याच्या राज्याची राखरांगोळी करतों !'

'ज्ञानसिहानें त्या बच्चमजीला चांगलीच अद्दल घड-विली नाहीं का ?' अनूपनें डॉक्टरांना विचारलें.

त्यावर डॉक्टर म्हणाले, 'पण तेवढ्यानें कुठें संपलें ? भारत देशाचे सैनिक नि बांगला देशाचे सैनिक हे एकत्रित झाल्यावर त्यांनीं जसें डाक्का शहरांत पळपुट्या पाकड्यांना पाणी पाजलें होतें, तशीच अवस्था ज्ञानसिहाच्या सैनिकांनीं बहादुरसिहाच्या सैनिकांची केली. बहादुरसिंहाला ज्ञानसिहानें चांगला चोप दिला नि ज्ञानसिहाच्या सैनिकांनीं बहादुर-सिंहाच्या साऱ्या सैनिकांना चांगलें झोडपून काढलें. बहादुर-सिंहाच्या सैनिकांनीं जेवायला जातांना सोबत शस्त्रें नेलीं नव्हतीं हें एक नि जेवणानंतरच्या जुलाबांमुळें त्यांच्या अंगांत अवसान उरलें नव्हतें हें दुसरें. अखेर बहादुरसिंह शरमला. त्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला नि त्यानंतर तो ज्ञानसिहाच्या वाटेला कधींहि गेला नाहीं !' असें म्हणून डॉक्ट-रांनीं आपली गोष्ट संपविली.

'दुसरी गोष्ट सांगा अंकल !' अनूप डॉक्टरांना म्हणाला.

'नाहीं बाळ ! मला उशीर झाला, तर वॉर्डांत वाट पहात असलेले पेशंटस् माझ्या नांवानें शंख करतील !' डॉक्टर अनूपला समजावूं लागले.

'प्लीज अंकल ! परवां मी जाणार इथून. आणखीन् एकच गोष्ट सांगा छोटीशी.' अनूप गयांवयां करूं लागला.

डॉक्टरांचें अंतःकरण कळवळलें. ते पुन्हा खुर्चीवर